मार्च
२०२०

# सनविवि

## महाराष्ट्र मंडळ बंगलोर



**प्रकाशक :**

**महाराष्ट्र मंडळ, बंगळुरू**
**#२८, २ रा क्रॉस, गांधीनगर**
**बंगळुरू- ५६०००९**
**ई-मेल:**
**snvv.mmbangalore@gmail.com**

**संपादक मंडळ :**

**प्रवरा संदीप**
**सरोज कलंत्रे**
**धनंजय चौगुले**
**गौरी नातू**
**देवश्री अंभईकर धरणगांवकर**
**रेखा नाईक**

**तंत्र सहाय्य्य:**

**कैवल्य लिमये**
**संदीप लिमये**

Photo courtesy –
Sumant Velankar

**स्पष्टीकरण:**

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यात व्यक्त झालेले विचार व मते ही त्या त्या लेखकांची वैयक्तिक असून महाराष्ट्र मंडळ त्यास जबाबदार नाही. तसेच हे मासिक विक्रीसाठी नाही.**

**अनुक्रमणिका**

संवाद

घडामोडी

संस्थापक दिवस

चित्रपट - दिठी

कथापूर्ती स्पर्धेच्या कथा

रेशिमगाठी

चित्रकाव्य स्पर्धेच्या कविता

# संवाद...

*नमस्कार,*

*सर्वप्रथम महिला वाचकांना जागतिक महिला दिनाच्या खूप शुभेच्छा. गणेशोत्सवात सालाबाद प्रमाणे घेतलेल्या साहित्य स्पर्धेतील कथा आणि कवितांचा एक अंक व्हावा असे मनात होते... ज्यामुळे लेखक आणि कवी मित्रांना प्रोत्साहन मिळेल. या अंकात इतर सादरं न घेता आपल्याला हे सर्व साहित्य वाचायला मिळेल. फेब्रुवारी महिन्यात जागतिक मराठी दिन (ज्येष्ठ कवी कुसुमाग्रजांचा जन्म दिवस) झाला... या निमित्ताने किताबखाना व महाराष्ट्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने साहित्य मेळावा आयोजित केला होता. लेखिका कवयत्री नीरजा, ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे व "मिशन रीड इंडिया" चा क्रीएटर... बुकलेट मॅन... अमृत देशमुख यांच्या उपस्थितीत ह्या मेळाव्याला रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला. खास आकर्षण म्हणजे मोठ्यांबरोबरच छोट्यांसाठीही लेखन कार्यशाळा घेण्यात आली. मराठी भाषा संवर्धन हा महाराष्ट्र मंडळाच्या उपक्रमाचा एक भाग असल्याने अशा प्रकारचे दर्जेदार कार्यक्रम नेहमीच करत राहण्याचा मंडळाचा मानस आहे. याविषयीचे प्रेक्षकांचे अभिप्राय या अंकात तुम्हाला वाचायला मिळतील.*

*राष्ट्रपती सुवर्ण कमळ विजेत्या "दिठी" या चित्रपटाचं प्रायव्हेट स्क्रिनिंग मंडळात झालं. निर्माते व प्रसिद्ध अभिनेते डॉ. मोहन आगाशे व दिग्दर्शिका सुमित्रा भावे यावेळी उपस्थित होते. त्याचं रसग्रहणही या अंकात वाचायला मिळेल.*

*युगाधी च्या निमित्ताने मंडळाचा संस्थापक दिन मोठ्या प्रमाणावर साजरा होत आहे. प्रमुख पाहुणे म्हणून सिने दिग्दर्शक मधुर भांडारकर यांची उपस्थिती असणार आहे. क्रिकेटवीर राहुल द्रविड व जवागल श्रीनाथ यांच्याशी गप्पा, अभिमान व योगदान पुरस्कार वितरण सोहळा आणि शताब्दी स्मरणिकेचे प्रकाशन असा भरगच्च कार्यक्रम आहे.*

*११ व १२ एप्रिल रोजी मंडळात संगीत मेळावा आयोजित केला आहे. यात "Music workshop" घेण्यात येईल तेंव्हा, संगीताची आवड ज्यांना आहे त्यां सर्वांनी जरूर भाग घ्या. १२ एप्रिल रोजी सायंकाळी डॉ. मृदुला दाढे यांचा "राहे ना राहे हम" हा चित्रपट गीतांचा सुवर्णकाळ उलगडत नेणारा बहारदार कार्यक्रम आम्ही घेऊन येत आहोत.तेंव्हा सर्वांनी जरूर सहभागी व्हा ही विनंती...*

*धन्यवाद...*
*प्रवरा संदीप*
*सनविवि संपादक मंडळ*
*महाराष्ट्र मंडळ, बंगलोर*

## वार्षिक सर्वसाधारण सभा

सर्व सभासदांना कळविण्यात येते की महाराष्ट्र मंडळाची
२०१९-२० ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ५ एप्रिल रोजी सायं ५ वा.
गांधीनगर येथे मंडळाच्या सभागृहात आयोजित केली आहे.
ई-मेल, पत्राद्वारे सर्वांना कळविण्यात येईलच.
सर्वांना विनंती की सभेला उपस्थित राहावे.

# घडामोडी...

## सहित्य मेळावा २०२० अभिप्राय

**दिवस पहिला - ग्रंथ दिंडी, कार्यशाळा**



किताबखाना वाचक मंचाच्या पुढाकार आणि विशेष सहकार्याने मंडळाने आयोजित केलेल्या साहित्य मेळाव्यातील पहिला दिवस होतकरू लेखक आणि काव्यप्रेमींच्या दृष्टीने मोठ्या पर्वणीचा ठरला.
लेखन कार्यशाळा या कार्यक्रमात सुप्रसिद्ध साहित्यिका नीरजा यांनी कथा-कविता-ललित लेखन याबद्दल दोन अडीच तास उपस्थितांना मार्गदर्शन केलं. वास्तव आणि फॅण्टसी यांचं योग्य मिश्रण आपल्या लेखनात असावं असं सांगून संवेदनशीलता व सर्जनशीलता यांचं लेखनाच्या दृष्टीने महत्त्व त्यांनी विशद केलं.
समृध्द शब्दभाण्डारा साठी चौफेर वाचन हवं तसंच कमीत कमी शब्दांत जास्तीतजास्त आशय प्रकट करायला शिकलं पाहिजे असा सल्ला आजच्या लेखन कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थींना नीरजा यांनी दिला. लेखनात भरकटलेपण येऊ नये यासाठी विषयाच्या बंदिस्तपणाच्या चौकटीचे भान असलं पाहिजे असा इशाराही त्यांनी दिला.
भाषिक आकलन उत्तम असल्यास कोणताही लेखनप्रकार आपण लीलया हाताळू शकतो हे नीरजा यांनी अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. कथा चांगली होण्यास लेखकाचे निरीक्षण बहुजिनसी, बहुमुखी आणि बहुस्तरीय असले पाहिजे, अनुभवांचं वेगळेपण खुबीने लेखनात दिसायला हवं या व अशा त्यांच्या tips प्रशिक्षणार्थींना नक्कीच मोलाच्या ठरतील.
त्यानंतर बेंगळूरूमधील निमंत्रित प्रतिथयश कवींचे बहुभाषिक काव्यसंमेलन झाले. कानडी, कोकणी, हिंदी, इंग्रजी कविता सादर केल्या गेल्या. त्यांच्या कवितांना रसिक श्रोत्यांची उत्तम दाद मिळाली.
एकंदरीत साहित्य मेळाव्याची सुरुवात छान झाल्याने श्रोते खूष होते. सभागृहातील उपस्थितीही लक्षणीय होती. संयोजक व कार्यकारीणी सदस्यांनी या इव्हेंटच्या यशस्वितेसाठी घेतलेल्या परिश्रमांमुळे लेखन कार्यशाळा आणि बहुभाषिक कवी संमेलन हे दोन्ही कार्यक्रम नेटके व रंगतदार झाले.

**धनंजय जोग**

शनिवार दिनांक 22 फेब्रुवारीला किताबखाना वाचक मंचाचा सहाय्याने महाराष्ट्र मंडळ बेंगळुरू ने साहित्य मेळावा आयोजित केला होता. त्याचे वेगळे पण दारात स्वागतासाठी घातलेल्या सुंदर रांगोळीतूनच जाणवले.
दिसामाजी काहीतरी ते लिहावे। प्रसंगी अखंडित वाचीत जावे॥
सुप्रसिद्ध लेखिका नीरजा यांची लेखन कार्यशाळा आणि छोट्या वाचक मित्रांमध्ये वाचनाचीआवड निर्माण करण्यासाठी राधिका साठे मंत्री, प्रज्ञा वझे घारपुरे आणि जाई पुणतांबेकर यांनी घेतलेली कार्यशाळा हे कार्यक्रमाचे वैशिष्ट्य.

उपक्रमाबरोबर कार्यशाळा घ्यायची कल्पना आवडली. त्याने उपक्रम जास्ती परिणामकारक होतो हे रेखा नाईक यांचे मत एकदम पटले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली त्यासाठी मा. नीरजा ताईबरोबर बरोबर अभय दीक्षित, बंगळूर मधल्या आपल्या लोकप्रिय लेखिका सानिया रेखाताई हे मान्यवर उपस्थित होते. जाई पुणतांबेकर यांनी "जाणे मी अज मी अजर" ही ज्ञानेश्वरीतील ओवी सादर करून छान वातावरण निर्मिती केली. डॉ. ललिता तळवलकरांचे सूत्रसंचालन नेमके व प्रभावी होते. रेखा ताईनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली व सहभागी होणाऱ्यांमध्ये मोठ्यांची 50 बालकांचे 40 अशी संख्या सांगताच बंगलोरमधील "मराठी मन" अशा उपक्रमांसाठी किती उत्साही आहे हे कळले.
त्यानंतर प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या नीरज यांनी कथा कविता आणि ललित लेख हे लेखनाचे प्रकार, त्यांचे भाषण visual slides आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद व सहभाग यांच्या सहाय्याने इतक्या सोप्या पण प्रभावीपणे उलगडून दाखविले की पुढचे दोन ते अडीच तास कसे गेले ते कळलेच नाही.
इथल्या मातीत मराठी रुजवून ते टिकवल्या बद्दल प्रथम त्यांनी मराठी भाषिक बंगळुर वासी यांचे कौतुक केले. पण त्याच बरोबर सध्या आपल्या माय मराठीत कशा प्रकारचे लेखन चालू आहे ते जाणून घेणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. नवीन नवीन लेखकांचे साहित्य वाचण्याने महाराष्ट्राबाहेर राहून मराठीत नेमका काय बदल घडतोय ते कळते यासाठी आपण आजूबाजूच्या वातावरणाशी जोडलेले आणि संबंधित (relevant) राहिले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.
सहभागी प्रेक्षकांचे आठ ते दहा जणांचे ग्रुप करून नीरजा ताईनी
- कथांचे विविध प्रकार
- लघुकथा दीर्घकथा कशा असाव्यात
- कथांची परिणामकारकता कशी वाढवावी
- उत्स्फूर्त लेखनाचे महत्व
- विसाव्या शतकातील महत्त्वाचे लेखक
- कविता म्हणजे काय
- विसाव्या शतकातील कवितेचे प्रकार/कृती
- व्याज कविता आणि अस्सल कविता यातील फरक
- ललितलेखन प्रभावीपणे कसे करावे

याबद्दल आणि इतरही भरपूर आणि उपयुक्त माहिती दिली म्हणून तर प्रेक्षकांच्या प्रश्नाचे व शंकांचे निरसन केले. कार्यशाळेचा समारोप करताना त्या म्हणाल्या "आपण व्यक्त होण्यासाठी लिहीत राहावे ते प्रकाशित व्हायलाच पाहिजे असे नाही मात्र चांगले लिहिण्यासाठी चांगले साहित्य वाचणे, भाषेचा अभ्यास पण गरजेचा आहे. हे साधले तर साहित्य निर्मितीत सहज झोकून देता येईल"
सहभागी होणाऱ्या प्रत्येकालाच या कार्यशाळेतून अधिकाधिक चांगले लिहिण्याची प्रेरणा मिळाली असेल. कार्यशाळेच्या आयोजनाबद्दल महाराष्ट्र मंडळ व किताबखाना वाचक मंच यांचे खूप आभार!

**संगीता वाड**

* * * * *

महाराष्ट्र मंडळ आणि किताबखाना वाचक मंच यांच्या संयुक्त विद्यमाने मंडळाच्या सभागृहात दोन दिवसीय साहित्य मेळावा (दि. 22 व 23 फेब्रुवारी रोजी) आयोजित करण्यात आला होता. त्या पैकी कवितेची कार्यशाळा ही नव कवी आणि नवोदित लेखकांसाठी पर्वणीच ठरली. सहाजिकच अनेक सदस्यांनी हजेरी लावली होती.
पहिल्या दिवशीचे सत्र सुप्रसिद्ध लेखिका सानिया यांच्या उपस्थितीत सुरु झाले. कार्यशाळेस सुप्रसिद्ध कवयित्री व प्रखर स्त्री वादी लेखिका नीरजा यांचे बहुमुल्य मार्गदर्शन लाभले.
Poetry is a spontaneous overflow of powerful feelings recollected in tranquility. असा विलियम वर्डस्वर्थ यांच्या वाक्याचा दाखला देत नीरजाताईनी कार्यशाळची अर्थपूर्ण सुरवात केली.
आपल्या ओघवत्या आणि सहज शैली मधे त्यांनी कविता व कथा लेखनाचे अनेक प्रकार व पैलू उलगडून दाखवले. काव्यातील आशय हे नेहमीच प्रतिमास्वरुप असतात असे त्यांनी सांगितले. कथा आणि कविता म्हणजे निबंध नव्हेत असे सांगून शब्दांचा बंदीस्तपणा तसेच बहूआयामी शब्दांचा वापर कलाकृती साठी आवश्यक असतो असे निरजा ताई नी सांगितले. चांगली कथा ही नेहमी बहुजिनसी, बहुमुखी आणि बहुस्तरीय असावी आणि मानवी मनाचे अंत:स्तर सहज उलगडणारी असावी असे जाता जाता नमूद केले.
लिखाण करताना, चौकस बुद्धी व चौफेर दृष्टी आवश्यक असल्याचे सांगितले. नेमकेपण हा लिखाणाचा आत्मा असतो असे त्यांनी सांगितले.
आपले लिखाण उत्तम व्हावे यासाठी इतरांचे लिखाण अवश्य वाचा असा त्यांनी सल्ला दिला. प्रतिथयश लेखकांचे व कविंचे दाखले दिल्याने कार्यशाळा रंगतदार झाली. आपल्या विवेचनात निरजा ताई नी अशा लिखाणाची ओळख करुन दिली आणि बारकावे समजावले.
आपले लिखाण उस्फूर्त असावे आणि लिहिताना चूक आधळल्यास निराश न होता परत परत लिहावे लागते तेव्हा धीर सोडू नये असं त्यांनी अगदी आवर्जून सांगितलं.

कार्यशाळेची सांगता सदस्यांच्या शंका निरसनाने झाली. एक नेटका कार्यक्रम दिल्याबद्दल आयोजकांना मनापासून धन्यवाद !

**राधिका मराठे.**

* * * * *

नमस्कार,
महाराष्ट्र मंडळ आणि किताबखाना वाचकमंच यांच्या संयुक्त विद्यमाने आज आपल्याला लेखिका नीरजा यांच्याबरोबर लेखन कार्यशाळेत सहभागी होण्याची संधी मिळाली, त्याबद्दल मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे. आजच्या कार्यशाळेत कविता, कथा आणि ललित लेखन म्हणजे नेमकं काय ? कथेचे विविध प्रकार, कविता कशी असावी, ललित लेखनात चिंतन किती महत्वाचे आहे या आणि यासारख्या अनेक गोष्टी आपल्याला कळाल्या. गेल्या दोन वर्षात लिहायला सुरुवात केल्यापासून मला नेहमी असे वाटते की मला फार काही जास्त सुचत नाही. माझ्याकडून फार कमी रचना केल्या जाताहेत. पण आज नीरजाताईनी जेव्हा सांगितले की लेखन हे spontaneous असते , जेव्हा सुचेल तेव्हा सुचेल, आपण patience ठेवले पाहीजेत, तेव्हा मला फार बरे वाटले. आजच्या कार्यशाळेने आपल्या सर्वांनाच एक खूप छान आणि लेखनदृष्टिने समृद्ध करणारा अनुभव दिला. महाराष्ट्र मंडळाला माझी विनंती आहे की असे अनुभव आम्हाला वारंवार मिळावेत.

**मानसी नाईक**

* * * * *

**कवितेच्या गावाला जाऊया**

२४ फेब्रुवारीला ...कवितेच्या गावाला जाऊया... नावाचं सुरेल सत्र घेतलं गेलं. यामध्ये रसिकांना मराठी बरोबरच कानडी, कोंकणी, इंग्रजी आणि हिंदी कवितांचा देखिल आस्वाद घेता आला. इथल्या मराठी साहित्य संमेलनात बंगळुरूची सर्वसमावेशक मेट्रोपॉलिटन संस्कृती अश्या प्रकारे सादर केली गेली, त्याबद्दल आयोजकांचं खास कौतुक आहे. श्री. अनील बोकील आणि सौ. माणिक पटवर्धन यांनी एकत्रितपणे कानडी कविता सादर केल्या. श्री. अनील बोकील यांनी आपल्या लक्षवेधी आवाजात आधी ज्येष्ठकवी कुवेम्पु यांची ...ओ नन्न चेतना... आणि डॉ. डी आर बेंद्रे यांची ...बेळकु... या कवितांचं मराठी अर्थ सांगितला आणि मग सौ. माणिक पटवर्धन यांनी कानडीमध्ये त्या वाचून दाखवल्या.
त्या पाठोपाठच श्री. आनंद नगरकर, यांनी ज्येष्ठ कोंकणी-भाषिक कवी, श्री रामचंद्र कोड्डुगु यांच्या ...देव कुठे शोधावा व काळ्या रंगावर लिहिलेल्या कविता सादर केल्या. त्यांच्यानंतर सौ. अनुजा मुडूर यांनी त्यांच्या आईच्या कविता सादर केल्या. मूळच्या बंगलोरच्या असल्या तरी त्यांच्यावर मूळ संस्कार मराठीचे झालेले आहेत. त्यांनी गांधीजी आणि ज्ञानेश्वरांवर लिहीलेल्या कविता सादर केल्या.
एवढा सगळा कार्यक्रम शांत आणि प्रसन्न मुखाने पाहात बसलेल्या मानसशास्त्राच्या शिक्षिका मा. शशिकला ताई यांची वेळ आली, तशी अगदी जोशात माणसाच्या अस्तित्वाबद्दल प्रश्न करणाऱ्या, स्वत:त तसेच सामाजिक कार्यात स्वत:चं धन्यत्व शोधणाऱ्या अशा काही खास इंग्रजी कविता सादर केल्या. Who am I? ने सुरुवात करून Crutches म्हणजे कुबड्यांवरची अप्रतिम कविता पेश करत सर्व श्रोत्यांना प्रेरित केलं.
या नंतरचं सादरीकरण झालं, हिंदी कवितांचं. कवी सौ. अंजनी चांडक यांच्या सहज सोप्या शैलीतल्या अगदी भावस्पर्शी कविता. “मला आजच्या जमान्यातल्या फेसबुकर कवी म्हणतात” अशी त्यांनी स्वत:ची ओळख करून दिली; आणि तरीही त्यांच्या तिन्ही कवितांवर सर्व श्रोत्यांच्या भरघोस टाळ्या मिळवल्या. सत्राची सांगता झाली, संपूर्ण संमेलनाच्या आदरणीय मान्यवर कवी नीरजा यांच्या कवितांसोबत. दोन्ही दिवस त्यांच्या कवितांच्या रसरंगात त्यांनी प्रेक्षकांना मनसोक्त रंगू दिलं होतं. स्त्रियांच्या दैनंदिन जीवनावर, तसेच त्यांची तुलना पृथ्वीशी करत, सद्ध्या देशातील स्त्रियांवर चाललेल्या अत्याचारांचा पडसाद त्यांनी त्यांच्या कवितांमधून अगदी तडफेने सर्वांच्या मनावर कोरला. महिला स्पेशल नावाची, मुंबई लोकलने प्रवास करणाऱ्या स्त्रियांचं विश्व उलगडून दाखवणारी, सर्वांच्या आवडीची कविता सादर करून त्यांनी अगदी सुयोग्य समारोप केला. या साऱ्या कवींना, पाचही भाषांसहित एकत्र गुंफून ठेवण्यासाठी आवश्यक असं उत्तम सूत्रसंचालन सौ. अनुराधा चौगुले यांनी केलं.

**प्रज्ञा घारपुरे वझे**

**दिवस दुसरा**



साहित्य कसं असावं, साहित्याची कलात्मकता याच्या पुढं जाऊन लेखकानं "मी साहित्य का लिहावं?" याचा विचार करण्याची गरज आहे, मला समाजाचा कोणता प्रश्न मांडायचा आहे, माझे शब्द कुणाची कळकळ सांगणार आहेत याचा विचार व्हायला हवा .. शंभर तोफात नाही एवढी ताकत शब्दात आहे. जेव्हा जेव्हा समाज यातनेनं ग्रासला तेव्हा तेव्हा साहित्याने समाजाला एक वेगळी दिशा दिली, नवा विचार दिला. साहित्य नुसता भाषालंकार नाही तर सामाजिक क्रांती घडवून आणायची ताकत साहित्यात आहे.
जेष्ठ साहित्यिक श्री. उत्तम कांबळे यांनी पोटतिडिकीनं मांडलेल्या विचारांनी खचाखच भरलेलं मंडळाचं सभागृह मंत्रमुग्ध झालं होतं.
सकाळ वृत्तसमुहाचे प्रमुख संपादक, ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. उत्तम कांबळे हे मंडळाच्या साहित्य मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून लाभले हे मंडळाचे भाग्य. श्री. उत्तमजींच्या साहित्य आणि मिळालेल्या सन्मान व पुरस्कारांच्या यादीने मंडळाचा डिस्प्ले बोर्ड पूर्ण भरून गेला होता!
अश्या या महान साहित्यिकाचे विचार ऐकायला मिळाले, भाषणानंतर त्यांच्याशी खूप आपलेपणाने वेगवेगळ्या विषयांवर बोलता आले, याबद्दल मंडळाचे मनापासून आभार.

**ओंकार संगोराम**

**बुकलेट मॅन**

सुखवस्तु, चाकोरीबध्द आयुष्य सोडुन एका मनस्वी मुसाफिराने वेगळी वाट धरलीये. हा तरुण चालला आहे भारतीयांमध्ये वाचनाची आवड जागवायला!
त्याने हाती घेतलंय mission : read India!
अमृत देशमुख अर्थात booklet guy .. त्याच्या ह्या mission : read India ला साथ लाभली आहे कित्येक लाखो वाचकांची!
आयुष्याच्या एका वळणावर ह्या यशस्वी Chartered Accountant ला वाटले की आपण काम, प्रमोशन, पैसा, ऐषोआराम या व्यतिरिक्त समाजासाठी काही तरी करण्याची गरज आहे. काय करावं हा विचार सुरु असताना अचानक आली ती युरेका मोमेन्ट!

अमृतला वाचनाची खूप आवड आहे. एकदा असंच, मित्राला एका पुस्तकाचा सारांश सांगितल्यावर त्याचा मित्र अमृतला म्हणाला, अरे वा ! मस्त, मी ते पुस्तक नक्की वाचेन. that's it! त्यातुन जन्मलं "booklet" नावाचं aap ज्यावर अनेक पुस्तकांचा सारांश वाचायला, त्याचबरोबर ऐकायलाही मिळतो. आणि तेही एकही पैसा न देता !
या app चे अनेक वाचक आहेत किंबहुना या aap मुळे अनेक वाचक serious reader बनले आहेत. अमृतला या aap मधुन कुठलाही आर्थिक फायदा होत नाही. अतिशय minimalistic राहणीमान असणाऱ्या अमृतने स्वतःच्या घरातुन इतर वस्तु काढुन टाकल्या आहेत आणि जवळजवळ तीन-एक हजार पुस्तक ठेवली आहेत, जी कोणीही येऊन वाचु शकतं !
असा हा social entrepreneur, अमृत देशमुख ! त्याला भेटता आलं, त्याचे विचार ऐकता आले, आयुष्याचा एक वेगळा दृष्टिकोन अनुभवता आला, यासाठी मंडळाचे आभार.

**ओंकार संगोराम**

# संस्थापक दिवस

**बुधवार २५ मार्च , सायं ५.३०**
**स्थळ : सेंट जोसेफ ऑडिटोरियम**

**ह्यावर्षी आपल्याला प्रमुख पाहुणे लाभले आहेत , तीनदा सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळवणारे सुप्रसिद्ध दिग्दर्शक...**

## श्री. मधुर भांडारकर

**अभिमान आणि योगदान पुरस्कारांचे वितरण आणि पुरस्कार विजेत्यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते केला जाईल.**

**शताब्दी निमित्त आपण स्मरणिका काढत आहोत. त्या स्मरणिकेचा प्रकाशन समारंभ ह्याच दिवशी होईल.**

**प्रमुख पाहुणे श्री मधुर भांडारकर प्रेक्षकांशी संवाद साधतील.**

**जेव्हा दोन दिग्गज क्रिकेटपटू एकत्र येतात तेव्हा त्यांच्या गप्पा ऐकायला आपण सगळेच उत्सुक असतो !!**

## श्री राहुल द्रविड

**ह्यांच्याशी संवाद साधतील सुप्रसिद्ध भारतीय गोलंदाज आणि आपले लाडके**

## श्री जवागल श्रीनाथ

**ह्या कार्यक्रमा आधी दर वर्षीच्या प्रथेप्रमाणे दुपारी ३.३० वाजता महाराष्ट्र मंडळाच्या हॉलमध्ये श्री सत्यनारायण पूजा संपन्न होईल.**

**ह्या संपूर्ण कार्यक्रमासाठी शुल्क नाही पण रसिकांच्या उपस्थितीचा अंदाज येण्यासाठी खाली दिलेल्या संकेत स्थळी आपले *नाव जरूर नोंदवायचे आहे.**

https://www.eventbrite.com/e/sansthapak-din-maharashtra-mandal-bengaluru-tickets-97760864377?aff=ebdssbeac

Sponsored by - CHITALE BANDHU MITHAIWALE



|| शतवर्षांचे अतूट नाते माऊली मराठीशी ||

**Maharashtra Mandal &**
**Maharashtra Niwas**
**Building Trust, Bengaluru**

celebrate together this GUDHIPADWA…

# *SANSTHAPAK DIN*

## Wed. 25th March 2020 Time: 5:30 PM







**MADHUR BHANDARKAR**
Chief Guest
(Three timesNational Award-winning Director)

**RAHUL DRAVID** in conversation with **JAVAGAL SRINATH**


*** Yogdaan Puraskaar * Abhimaan Puraskaar ***

*** Publication of Shatabdi Souvenir ***

** PROGRAM IS OPEN TO ALL BUT **REGISTRATION IS MANDATORY** (at below link) –
https://www.eventbrite.com/e/sansthapak-din-maharashtra-mandal-bengaluru-tickets-97760864377?aff=ebdssbeac

**Venue:**
**St.Joseph College Auditorium, Bengaluru**
**Contact: Sneha Ketkar: 9980774542 / Veena Kawathekar: 9448304170**

# दिठी




महाराष्ट्र मंडळात ,सुमित्रा भावे दिग्दर्शित , डॉ . मोहन आगाशे निर्मित "दिठी" या राष्ट्रपतिपारितोषिक (सुवर्ण कमळ) विजेत्या चित्रपटाचं प्रायवेट स्क्रिनिंग आयोजित केलं होतं. हाताशी अगदी कमी वेळ होता, तरीही ४५-५० चोखंदळ प्रेक्षकांनी आवर्जून हजेरी लावली... आणि चित्रपटाचा आस्वाद तर घेतलाच, शिवाय नंतर त्यावरच्या चर्चेत ही अनेकांनी उत्स्फूर्त भाग घेतला !

दि .बा. मोकाशी यांच्या 'आता आमोद सुनासी झाला ' या कथेवर आधारित दिठी हा चित्रपट... रामजी नावाच्या एका विठ्ठलभक्त वारकऱ्याचा तरणाताठा मुलगा पुरात वाहून जातो... आणि रामजी हवालदिल होतो... विठ्ठलाला प्रश्न विचारू लागतो... की असं का? तीस वर्ष एकदाही मी तुझी वारी चुकू दिली नाही... एवढी तुझी भक्ती केली त्याचं हेच का फळ? त्याच वेळी गावात एक गाय अडलेली असते... काही केल्या तिची सुटका होत नसते... हलक्या हाताने अडलेल्या गाभण गाईची सुटका करण्यात वाकबगार असणारा रामजी तर असा मुलाच्या दुःखात हातपाय गाळून बसलेला! त्याला कसं बोलवावं... पण अशा आणिबाणीच्या वेळी, प्रसंग ओळखून तो धावून येतो, मोठ्या प्रयासाने गायीचं बाळंतपण करतो... त्या वेळी त्या मुक्या जनावराचं दुःख समजून घेता घेता, तिच्याशी संवाद करता करता, जन्म आणि मृत्यू दोन्हीच्या मुळाशी असणाऱ्या वेदना जाणवून आयुष्याकडे पाहण्याची त्याची "दृष्टी" म्हणजेच "दिठी" बदलत जाते... विस्तारते... त्याची ही कथा!

असं म्हणतात की... ज्ञानेश्वरी नुसती वाचू नये... एक तरी ओवी अनुभवावी. किशोर कदम, डॉ. मोहन आगाशे, दिलीप प्रभावळकर, गिरीश कुलकर्णी, अमृता सुभाष, शशांक शेडे या सर्वच कलाकारांनी अप्रतिम अभिनयातून हा अनुभव जिवंत केला आहे. सर्वांनी आवर्जून पाहावा असा हा चित्रपट आहे.

***प्रवरा संदीप***

# कथापूर्ती स्पर्धेचे लेख

कथाबीज परिच्छेद –

- झुंजुमुंजू झालं. रातराणीच्या सुगंधाचा दरवळ कमी होताच प्राजक्ताने पखरण केली. कळ्या उमलू लागल्या. झाडांची पानं सळसळ करु लागली. स्वच्छ निरभ्र आकाशात एकमेकांच्या साथीने विहार करण्यासाठी पक्ष्यांनी किलबिलाट सुरु केला. निसर्गाला गुरु मानून, मी मनाची मरगळ झटकली आणि प्रसन्न चित्ताने दिवसाचे स्वागत करण्यासाठी हात जोडले........

- पुन्हा एकदा नजर भिरभिरली. सगळी जय्यत तयारी झाली होती. जीवापलीकडील जपलेल्या नात्यांचा, अनुभवांचा कस पाहाणारा हा प्रसंग... वेळ जसजशी जवळ येत होती तसतशी हृदयाची धडधड वाढू लागली.........

* * * * *

# कलाटणी

## लेखक - धनंजय जोग

"गेल्या खेपीसारखा औंदा राडा करू नका. जरा बी ढिलाई न्हाई पायजेल्." अशा भरतवाक्यानं सुभानरावांनी कार्यकर्त्यांच्या निवडणूक मेळाव्याची सांगता केली, अन् तडक डाक बंगल्याच्या दिशेने निघण्यासाठी त्यांनी ड्रायव्हरला इशारा केला.

माळकरी असलेले सुभानराव आषाढी-कार्तिकीची नियमित वारी करीत असल्याने सर्वांना त्यांचेबद्दल आदरयुक्त आकर्षण वाटे. लोकांनी गळ घातल्यामुळे आणि त्यांच्या अडी-अडचणी सोडवण्यासाठीच केवळ त्यांनी वीस वर्षापूर्वी प्रथम आमदारकीची निवडणूक लढवली आणि ते प्रचण्ड मताधिक्याने निवडूनही आले होते. त्यानंतर सतत त्यांना यश मिळत गेले. पक्षातील एक मातबर असामी असा त्यांचा लौकिक वाढू लागला. याच कारणामुळे पक्षातील काही नेते त्यांचा द्वेष करीत. अशा हितशत्रूंच्या नादानंच त्यांचा एकुलता एक लेक - दौलती बिघडला होता. हा एक सल, ही एक बोच त्यांना अलिकडे खूप अस्वस्थ करी.

निवडणूकीसंबंधी मार्गदर्शनाबद्दलची कार्यकर्त्यांची सभा काहीशी घाईने आवरता घ्यावी लागल्याने सुभानरावांचा हिरमोड झाला होता. पण त्यांचाही नाइलाज होता. प्रत्यक्ष खासदारच येऊन डेरेदाखल झाले असल्याचा सांगावा आल्यामुळे त्यांना सभा आटोपती घ्यावी लागली. त्यांच्या डोक्यात विचारांचं काहूर माजलं. ' पक्षश्रेष्ठींनी वारंवार बजावून देखील आपल्याला वंजारी समाजाला जवळ करता आलं नाही. एके काळी पक्षाची सारी भिस्तच ज्यावर असा तो वंजारी समाज काहीसा दुखावला गेला होता, दुरावला होता व याला कारण आपला नतद्रष्ट कारटा...'

कर्कश्य वाजणाऱ्या जीपच्या हॉर्ननं ते भानावर आले. एव्हाना जीप डाक बंगल्याच्या पोर्चपाशी येऊन थांबली होती. बाजूलाच पार्क केलेल्या झोकदार मर्सिडिज बेंझ ने सुभानरावांचे लक्ष वेधले. सुभानरावांचे कट्टर विरोधक आणि जिल्हा निवडणुकीचे समन्वयक खासदार रणदिवे अचानक आले होते.

"या..या, आमदार, कार्यकर्त्यांच्या गराड्यातनं सुटला म्हणा की एकदाचा, बाकी खंद्या निष्ठावंतांची फौज आहे तुमच्याबरोबर, त्याशिवाय का जनता जनार्दनानं चार वेळा यशस्वितेची माळ गळ्यात घातली तुमच्या ! कोणती पट्टी पढवीत होतात कार्यकर्त्यांना ? असं विचारीत रणदिव्यांनी हातातला ग्लास खाली ठेवला आणि आलिशान सोफ्यावर ते काहीसे रेलून बसले.

"न्हाई म्हंजी, हेच की मागल्या बारीसारखं गाफील राहू नका... औंदा बक्कळ जोर लावा... जनतेची गाऱ्हाणी बयाजवार ऐकून घ्या... मतदार याद्या तपासून पहा... असं सांगत हुतो त्यानला..." सुभानराव उत्तरले.

"सुभानराव, ही तुमची आमदारकीच्या इलेक्शनची पाचवी वेळ ! अनुभवी आहात." असं म्हणून छद्मी हसत रणदिव्यांनी सिगरेट शिलगावली व एक जोरकस झुरका ओढत ते पुढे म्हणाले, "हां, त्या वंजाऱ्याच्या म्हातारीला बरीक सांभाळा बरं, तुमच्या दिवट्या पोरामुळं गमावलंय् तिनं सुनेला. या घटनेचं भांडवल करू शकते विरोधी पार्टी...." धोतराच्या सोग्यानं घाम पुसत अस्वस्थ चित्तानं सुभानराव ऐकत होते.

रणदिव्यांचा निरोप घेऊन सुभानराव डाक बंगल्याच्या व्हरांड्यात आले. काही क्षण विचार करून त्यांनी वंजारी वस्तीतील आपल्या हस्तकाला - मैलारीला फोन लावला. हलक्या आवाजात फोनवर मैलारीला काही सूचना देताना त्यांचा

चेहरा काहीसा संत्रस्त दिसत होता. कपाळावरील घाम ते वारंवार पुसत होते. त्यांचं बोलणं ऐकून मैलारी उत्तरला, " बिनघोर राहा मालक तुमी. काय बी काळजी करू नगा. समदी वेवस्था करून ठिवतो." मैलारीच्या या बोलण्याने त्यांना थोडं हायसं वाटलं. तरी मनात चलबिचल चालूच होती. वंजारी वस्तीतल्या म्हातारीबद्दल केलेली रणदिव्यांची सूचना त्यांना विचलित करत होती. द्विधा मन:स्थितीत ते सापडले होते.
जीपच्या वेगाबरोबरच सुभानरावांच्या मनातील विचारचक्रेही धावू लागली. म्हातारीच्या सुनेला नासवल्याची लेकाची - दौलतीची चूक झाली हे खरंच होतं. हा मोठाच प्रमाद घडला होता लेकाकडून... म्हणून साम - दाम - दंड - भेद सगळे प्रकार वापरून म्हातारीची समजूत घालण्याचे ठरवूनच ते निघाले होते.
वस्तीतील प्राथमिक शाळेपाशी जीप पार्क करण्यास त्यांनी ड्रायव्हरला खूण केली. मैलारी त्यांचेच दिशेने येत होता. जीप मधून उतरून एकवार मैलारीकडे त्यांनी प्रश्नार्थक नजरेने पाहिले. "म्हतारी कवाचीच येऊन बसलिया हापिस खोलीत." मैलारी उत्तरला. हातातली सिगरेट बुटाने चिरडून सुभानराव ऑफिस रूममध्ये गेले. सुन्नावस्थेत म्हातारी गुढग्यात मान घालून बसली होती. तिचा जरी चेहरा निर्विकार असला तरी ती डोळ्यांतून अंगार ओकते आहे असं क्षणभर सुभानरावांना वाटलं.
"हे बघा माई जे झालं ते लईच वंगाळ झालं. लेकाला काय अवदसा आठवली अन त्याच्याकडून घडू नये ते घडलं. एक डाव माफी करा पोराला. भाड्यानं मोठाच गुन्हा केलाय. मान्य हाये मला. मन मोठं करून पदरात घाला त्याची आगळीक" सुभानरावांच्या बोलण्याकडे म्हातारीचे लक्ष नव्हते. निश्चल, पुतळ्यागत ती बसून राहिली होती.
एव्हाना रात्रीचे नऊ वाजले होते. एक प्रकारची भयाण शान्तता त्या अंधाऱ्या खोलीत जाणवत होती. लांबवरून कुत्र्याचं केकाटणं ऐकू येत होतं. सुभानरावांनी नोटांची पुडकी तिच्यापुढे फेकून तिला पैशांची लालूच दाखवली, पण म्हातारी ऐकायलाच तयार नव्हती. आता मात्र सुभानराव हतबल झाले. त्यांची नजर रूम मध्ये सर्वत्र भिरभिरली. मैलारीने सांगितल्यागत् सगळी जय्यत तयारी केली होती. समोरील रस्त्याच्या खांबावरील ट्यूब लाईट स्विचऑफ करून ठेवली होती. रूमपाशी कुणाला फिरकू दिलं नव्हतं, मोकाट कुत्र्यांना लांबवर पिटाळून लावलं होतं, सर्वत्र चिडीचुप शांतता होती. विचारांच्या गर्तेतून भानावर येताच सुभानरावांनी उद्विग्नतेनं एक शिवी हासडली. कोणत्याही मार्गाने म्हातारी बधत नव्हती. म्हातारीकडे ते काहीशा खुनशी नजरेनं पाहू लागले. खिशातून क्वार्टर काढून त्यांनी एका दमात घशाखाली रिचवली. गावच्या जनतेशी जीवापलीकडील जपलेल्या नात्यांचा, अनुभवांचा कस लागणारा प्रसंग या म्हातारीच्या निमित्ताने येऊन ठेपला होता. घामानं पार चिंब झालेल्या सुभानरावांचा चेहरा भेसूर दिसू लागला.
नकळत त्यांच्यातील सैतान जागा झाला. त्यांचा हात खिशातील पिस्तुलाकडे गेला. पिस्तुलावरील पकड घट्ट झाली. त्यांनी डोळे गच्च मिटून घेतले. जसजशी काही निर्णय घेण्याची वेळ जवळ येत चालली तसतशी सुभानरावांच्या हृदयाची धडधड वाढू लागली. आणि...आणि अचानक काही आक्रीत घडले. त्यांना नजरेसमोर पंढरीची वारी दिसू लागली. विठ्ठलनामाचा गजर त्यांचे कानी घुमू लागला. दिंड्या पताका मिरवत असलेले वारकरी डोळ्यांसमोर उभे ठाकले. त्या वारकऱ्यांच्या भाऊगर्दीत त्यांना स्वतःचीच पुसटशी प्रतिमा दिसू लागली. अन् लागलीच ते भानावर आले.
तंद्री लागलेल्या मूक म्हातारीच्या हतबलतेनं सुभानरावांच्या जिवाची कालवाकालव झाली. मनात शिरू पाहणाऱ्या कलीची त्यांना मनस्वी चीड आली. दुःखातिशयाने त्यांना मोठा हुंदका फुटला. त्यांच्यातला पापभिरू माळकरी जागा झाला. काही क्षण मनाचा ताबा घेऊ पाहत असलेल्या नीच सैतानी प्रवृत्तीचा त्यांच्या आजवरच्या सुसंस्कारांपुढे पराभव झाला. सद्गदित अवस्थेतच त्या वंजा-याच्या म्हातारी समोर त्यांनी गुढगे टेकले.... तिचे हात हाती घेऊन ते भावविव्हल झाले.... केवढी मोठी चूक आपल्या हातनं घडत होती या विचारानं डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहू लागले. नको ती सत्ता... नको ते राजकारण ... नको ती आमदारकी... असं पुटपुटत त्यांनी म्हातारीच्या पायावर डोके ठेवले..

* * * * *

# पाठलाग

## लेखिका - नेहा भदे

पुन्हा एकदा नजर भिरभिरली. सगळी जय्यत तयारी झाली होती. जीवापलीकडील जपलेल्या नात्यांचा, अनुभवाचा कस पहाणारा हा प्रसंग. वेळ जसजशी जवळ येत होती तसतशी हृदयाची धडधड वाढू लागली. पण मी घरातला एकमेव कर्ता पुरुष होतो. आईने जे काही सांगितलं त्यानंतर हातावर हात नी पायावर पाय ठेऊन बसणं शक्यच नव्हतं. तिने तसं बसूही दिलं नसतं. मी माझं आराध्य दैवत जेम्स बाॅंड ची आठवण काढली. छातीवर हाताने क्राॅस केला. 'आई, येतो गं',आईच्या कानावर घालून मी निघणार तेवढ्यात आई म्हणाली,' जपून रे बाब, जे काय कानावर पडलय ते खोटं ठरू दे. परमेश्वरा, माझ्या लेकरांच्या हातून काहीही विपरीत होऊ देऊ नकोस रे बाबा'. मेलोड्रामा करावा तर तो आईनेच!
मी कमरेचा पट्टा चाचपून पाहीला. हाताला जी वस्तू लागायला हवी होती ती लागली. मी चालू
पडलो. मनांत विचारांचा नुसता गुंता!

सुभाष बद्दल जे कळलंय ते खरं असेल का? सूलूला ह्या प्रकरणाची माहीती असेल का? सूलूच्या, माझ्या बहीणीच्या आठवणीने जीवाचं पाणी पाणी झालं. सुभाषशी लग्न करण्याचा सूलुने हट्ट केला म्हणून नाहीतर त्याच्यासारख्या चक्रमादित्याशी मी माझ्या बहीणीचं लग्नं मुळीच होऊ दिलं नसतं. ह्या सुभ्याचा बिझनेस काय तर म्हणे CCTV,स्पाय कॅमेरे, गॅजेट्स विकणे! लोकांनी कायम संशयी राहाणे, हे ह्याच्या धंद्याचं गमक!
सूलूपण एवढी वाभरट आहे की ज्याचं नाव ते. लहानपणापासून भूताखेतांच्या गोष्टींवर पोसलेला तिचा पिंड! अंधारात, पेटत्या उदबत्या तोंडात धरून भूत भूत म्हणून मला म्हणजे स्वत:च्याच भावाला घाबरवण्याची एकही संधी तिने सोडलेली नाही!
तर अशा सूलूचं कन्यादान करण्याची वेळ बाबांच्या माघारी माझ्यावर आली.
माझ्या पायांपेक्षाही माझ्या विचारांची गाडी जोरात धावत होती. इतक्यात दूरून दोन माणसं बाजाराकडे घाईघाईने निघालेली दिसली. त्यातल्या एकाने खाकी पॅंट नी खाकीच बुशशर्ट घातलेला होता. हा तर सतीश, CCTV कॅमेरे लावून देणारा टेक्निशियन. आमच्या परमपूज्य जीजाजींचा उजवा हात! त्याच्याबेरबरच्या दूसर्या माणसाला मात्र मी ओळखलं नाही. 'सत्या',मी हटकलं. कुठे निघालास एवढ्या घाईघाईने? आणि तुझ्याबरोबर आहेत हे कोण? पाहीलं नाही कधी ह्यांना.' 'आरं तिच्या मारी, तूमी वळखत न्हाई का ह्येंना? हे फडणवीस!'
'अरे मी सहजच विचारलं, येवढा का भडकलास?' मी सत्याला शांत करण्याच्या उद्देशाने म्हणालो. 'तुमी? आन् सहज? तुमी जेम्स बाॅंडची अवलाद हाये, लहानपणापासूनच वळखतो की मी! तुमी तुमच्या वाटंनं जा आन् आमाला आमच्या वाटंनं जाऊ दे. आमच्या भानगडीत पडू नगा', सत्या उतरला. मी अजूनतरी एवढा मोठा डीटेक्टीव्ह झालो नव्हतो. पण प्रयत्न चालू होते.
सत्याचं मला नवल वाटलं, इतक्या साध्याशा प्रश्णावर त्याने इतक्या तिरक्यात शिरावं?
त्या माणसाला कुठे पाहिलंय का? कुठे बरं? हा, आता आठवलं! सिग्नल पाशी स्पायकॅमेरे असलेली पेनं विकणारा विक्रेता, म्हणजे हा ही आमच्या जिजाजींचाच चेला! मी त्यांना ओलांडून पुढे निघालो पण मनांत शंकेची पाल चुकचुकली. सत्याने भानगडीत पडू नका असं सांगितलं होतं. ह्याचा अर्थ काहीतरी भानगड होती!
जी मला माहीती नव्हती. गावात कूजबूज चालू आहे ह्या सत्याबद्दल. मी ह्या जोडीच्या मागे जायचं ठरवलं. त्यांना दिसणार नाही अशा बेताने त्यांचा पाठलाग करायला लागलो.
दोघे झपाझप चालत होते. एका बोळात शिरताना मला ते दिसले.अवघ्या मिनिटभराचा अवकाश पण
दोघे कुठे गुप्त झाले काही कळेना. असा कसा मी चुकलो? ह्यांचा माग कसा काढू? विचार करतोय तेवढ्यात सूलू नी सुभाष ही जोडगोळी बोळाच्या दूसर्या बाजूने आत शिरलेली दिसली. सुभाष मोबाईल वर बोलत चालत होता नी सूलू त्याला अगदी खेटून चालत होती. हूश्श! दोघांनीही मला पाहीलं नव्हतं! नाहीतर,' दिव्यचक्षु Private eye'म्हणण्याची संधी सूभ्याने सोडली नसती. नी सूलू त्यांवर खूप खिदळली असती.
दोघे एका दाराच्या बाहेर उभे. सूलूने आपला मोबाईल काढला नी तोंडाचा चंबू करून एक सेल्फी काढली.
आतून कुणीतरी दार उघडलं. दाराचा कर्रकर्र आवाज, नी नंतर कडी लावून बंद करण्याचा आवाज, हे दोघे त्या दाराआड गुडूप! माझं कुतूहल चाळवलं. काय असेल आत? हे घर कुणाच्या वापरातलं नव्हतं. मागे कुणी एक इसम इथे रहायचा. पण आजकाल भूतबंगला म्हणूनच ओळख! तेवढ्यात आतून सत्याच्या व सूभ्याच्या बोलण्याचा आवाज आला. म्हणजे हे दोघे अन् ते दोघे संशयित ह्या बंद दरवाजा आड आहेत तर! मातोश्रींची खबर पक्की दिसतेय. इथे काहीतरी पाणी मुरतय!
मी कंबरेच्या पट्ट्यात लावलेली वस्तू काढली, तो स्क्रयू ड्रायव्हर होता. माझा हात थरथर कापत होता. कपाळावर घाम फुटला होता. ह्रुदयाची धडधड वाढत चालली होती. आत काय दिसणार? किती भयंकर असणार? किती कवट्या? किती हाडं?
मी स्क्रुड्रायव्हर, दरवाजाच्या खिळ्याला लावणार एवढ्यात पोलीसांची गाडी तिथे आली. इन्सपेक्टर नी मला ओळखलं. गाडीतनं उतरत ते म्हणाले,' काय म्हणतां प्रायव्हेट डीटेक्टीव्ह? काय तपासणी चालवलीय? आम्हाला नाही का सांगणार?
'सरकारचा पगार खाणार्यांनी गुन्ह्याचा शोध स्वत: लावायला हवा',मी मनांत म्हणालो. त्यातून सूलू व सुभाष माझे सगळ्यांत जवळचे नातेवाईक. माझ्या आतापर्यंतच्या डीटेक्टीव्हगिरीतल्या अनुभवाचा कस लागण्याची वेळ आज आली होती. ब्लॅक मॅजीक करताना दोघांना रंगेहात पकडण्याचं व आईसमोर घेऊन जाण्याचं काम द्दष्टीक्षेपांत येत चाललेलं.
'नाही म्हणजे तसं काहीच नाही, कुठे काय? काहीच तर नाहीये इथे.'मी इन्स्पेक्टर ना म्हणालो.
'नाही कसं? उघडा तो दरवाजा. जोरात थाप मारा दरवाजावर'. माझा नाईलाज झाला. मी जोरात टकटक केली. कर्रकर्र भीतीदायक आवाज! दरवाजा उघडला.'भाऊ तू?' सूलू ने आ वासला! पाठोपाठ सुभाष! 'या या इन्सपेक्टर साहेब, तुमचीच वाट पहात होतो. हे पहा नवीन CCTV कॅमेरे आणलेत. पोलीस स्टेशनात लावायचेत ना? मग इथून गोडाऊन मधूनच घेऊन जाऊ. आणि माझ्याकडे खालून वरपर्यंत पहात तो म्हणाला,' हे दिव्यचक्षु प्रायव्हेट आय तुमच्याबरोबर कसे?'
इन्सपेक्टर नी काही बोलायच्या आधीच मी पट्कन आत शिरलो. म्हणालो,'सुभाष,मला ड्रोन आणि त्यांवर बसणारे स्पायकॅमेरे हवे आहेत. प्रायव्हेट डीटेक्टीव साठी अत्यंत जरूरी'. माझ्यातल्या एकलव्याने मनातल्या मनांत सद्गुरू जेम्स बाॅंड चे आभार मानले, शेवटी त्यांनी शिकवलेलं प्रसंगावधान कामी आलं. माझा पोपट होता होता राहीला. मी एका फटक्यात गोडाऊन मधून नजर फिरवली. सूलू आणि सुभाष ब्लॅक मॅजिक करतात, आत्म्यांशी बोलतात ही माहीती पडताळून पहायची होती. तिथे कूंकू, बुक्का, बिब्याने फूल्या मारलेल्या काळ्या बाव्हल्या, धूप,पेटलेल्या उदबत्या, कवटी,सांगाडा, काळीकुट्ट मांजर असं काहीच नव्हतं.

सत्या मात्र माझ्याकडे विचित्र नजरेने पहायला लागला. ‘वैनी, आजवर तुमचा भावड्या एकलव्याच्या निष्ठेनं आपल्या मागं लागायचा आता द्रोणाचार्यांच्या दृढतेनं मागं लागणार असं दिसतय!!

* * * * *

# आकाश क्षितिजापलिकडले...!

## लेखिका - स्नेहा भुर्के

पुन्हा एकदा नजर भिरभिरली. सगळी जय्यत तयारी झाली होती. जीवापलीकडील जपलेल्या नात्यांचा, अनुभवांचा कस पाहणारा हा प्रसंग..वेळ जसजशी जवळ येत होती तसतशी हृदयाची धडधड वाढू लागली.
खरं तर मनू आणि अभय दोघेही ५१वा वाढदिवस करु म्हणून पाठीमागे लागले होते पण मीच नाही म्हटलं होतं. यावेळेस मात्र मीच सांगितलं सगळ्यांना बोलवायला. मनू आणि मुग्धा थोड्याशा आश्चर्यानेच पण उत्साहात कामाला लागल्या होत्या. माझी दोन्ही मुलं,सून,जावई,माई-तात्या आणि जिवाभावाची मैत्रीण नंदाताई इतकेच जवळचे लोकं मला अपेक्षित होते,पण उत्साहाच्याभरात दोघींनी दीर,भाऊ,दोन्ही नणंदा असा सगळाच गोतावळा जमवला होता. ही अनपेक्षित गर्दी पाहून धीर थोडा खचला होता,पण मनाशी ठाम निर्णय केला;आयुष्यात एकदा असाच धीर खचला होता,आता पुन्हा नाही......
तात्यांनी खड्या आवाजात एकदाच सुनावलं,"माधवरावांशी लग्न करायचं नसेल तर घरातून बाहेर व्हायचं." त्यावेळेस घरातून बाहेर पडले असते तर,माझं श्राद्ध घातलंच असतं त्यांनी पण माई आणि माझ्या लहान भावंडांना सुद्धा सुखाने जगून दिलं नसतं. खरं तर शाळेत असल्यापासून कदम बाईबरोबर मी आदिवासी पाड्यातल्या लोकांना मदत करायच्या कार्यात सहभागी होत होते. बाबा आमटेंच्या कार्याने भारावून गेले होते. बाई मला अश्या मोठ्या लोकांच्या कार्याची पुस्तकं वाचायला द्यायच्या. माझ्या आयुष्याचं ध्येय हळू हळू निश्चित होत होतं आणि त्यातच महाविद्यालयीन जीवनात पाऊल पडताच मला सतीश भेटला. आमचं ध्येय एक होतं म्हणून कि उमलत्या वयाचा परिणाम म्हणून पण आम्ही दोघे एकमेकांच्या प्रेमात पडलो. खरं तर तरुण वयातलं एखादं प्रेमी युगुल आपलं घरकुल कसं उभं करायचं याची स्वप्नं बघतात,पण आम्ही मात्र बाबांसारखंच एक आनंदवन उभं करायचं स्वप्न पाहत होतो. पण तात्यांच्या डोळ्यातल्या त्या निखाऱ्यांनी एका क्षणार्धात माझ्या स्वप्नांची राख केली होती. त्यांच्या विरोधात जाण्याचं धाडस मी तेंव्हा करूच शकले नाही.
नंदाताईने घट्ट पोटाशी कवटाळून घेतलं आणि म्हणाली,"अगं वेडाबाई,या वयात ही अशी वेडी स्वप्नं सगळेच बघतात,पण जीवापाड प्रेम करणारा नवरा मिळाला कि तुझा संसारच तुझं आनंदवन वाटेल बघ तुला." कुठेतरी तीच वेडी आशा उराशी घेऊन माझा माधवरावांबरोबर संसार सुरु झाला. पैशाची आणि खाण्यापिण्याची ददात कधीच नव्हती पण म्हणून मी सुखी होते का? आर्थिक प्रगतीपलीकडे कुठलंच ध्येय माधवरावांचं कधी नव्हतंच. तात्यांची मृदू आवृत्ती म्हणजे माधवराव. तात्यांशिवाय घरात कोणाच्याच शब्दाला काही किंमत नव्हती. माईला सतत घालून-पडून बोलणं , तिच्यावर सतत खेकसणं हेच केलं त्यांनी आयुष्यभर. आणि माधव, सिनेमा कुठला बघायचा,मी साडी कुठली नेसायची,कुठले दागिने घालायचे हे सगळं तेच तर ठरवायचे. मत विचारात घेण्याचा रिवाजच नव्हता. तात्यांसारखं ते कधीच घालून-पाडून बोलले नाहीत,कधी हातही उगारला नाही पण म्हणून त्यांनी प्रेम केलं म्हणायचं का माझ्यावर?
आता ईतक्या वर्षांनी हे सगळं उफाळून यायला कारणही तसं खासच ठरलं होतं. बऱ्याचश्या NGO मार्फत थोडयाफार प्रमाणात मी आता कामाला सुरुवात केली होती. अश्याच एका NGO ने यावेळेस एका आदिवासी पाड्यात जायची टूम काढली होती. तिथे फेरफटका मारत असताना अचानक कोणीतरी नलु म्हणून हाक मारली. नलु माझं माहेरचं नाव,इथे या नावाने मला ओळखणारं कोण होतं? एकदम मागे वळून पाहिलं तर समोर सतीश उभा होता. चेहऱ्यावर तेच शांत भाव आणि ओठांवर आजही तेच मिष्कील हसू. कॉलेजमध्ये होता तसाच शिडशिडीत बांधा, चेहरा रापलेला पण तिशीतल्या तरुणालाही लाजवेल असा उत्साह. सगळा परिसर त्याने आम्हाला स्वतः फिरवला. प्रत्येक छोट्या-छोट्या प्रकल्पाची इत्यंभूत माहिती दिली. निघायच्या वेळेस आम्ही दोघेच त्याच्या ऑफिसमध्ये बसले होतो. त्याच्याकडे बोलायला खूप काही होतं;आम्ही दोघांनी एकत्र पाहिलेलं स्वप्न तो प्रत्यक्षात जगत होता. त्याने हजारो लोकांचे संसार उभे केले होते आणि मी... माझ्याच छोट्याशा संसारात समाधान मानून घेतलं होतं. सामाजिक कारणांसाठी देणगी द्यायला म्हणून माधवरावांनी जे चेकबुक दिलं होतं ते उघडलं आणि त्याच्यावर सही करायला लागले तर डोळ्यातून घळा-घळा वाहणाऱ्या अश्रूंनी ते पान चिंब भिजून गेलं. माझ्या थरथरणाऱ्या हातांवर क्षणभर त्याने हात ठेवला आणि मग त्याच हातांवर डोकं ठेवून मी मनसोक्त

रडून घेतलं. पाय निघत नव्हता पण मुग्धाचा फोन येत होता आशूच्या वाढदिवसाची आठवण करून दयायला. मला परत फिरणं भाग होतं.
परत आल्यापासून डोळ्याला डोळा लागत नव्हता. मनात विचारांचं काहूर माजलं होतं. केक कापल्याबरोबर पहिला घास आशुने त्याच्या लाडक्या आजीला भरवला होता. क्षणभर वाटलं याहून सुख ते काय वेगळं? मग हळूच त्या भाऊगर्दीतून बाजूला होऊन मी माझ्याच कुटुंबाच्या चौकटीकडे पाहू लागले. अभय-मुग्धा सुखात होते त्यांच्या दुनियेत. माधवराव कुठल्याच गोष्टीत कधी भावनिकरित्या गुंतलेले नव्हते. नातवंड-परतवंडांच्या कौतुकापेक्षा तेव्हढा घटकाभर वेळ जातो म्हणून पाय ओढत माई-तात्या प्रत्येक कार्यक्रमाला आवर्जून हजेरी लावत होते. यातल्या कोणालाच खऱ्या अर्थाने माझ्या असण्याची गरज नव्हती. मनूच थोडी हळवी आहे पण या सगळ्यांत माझा निर्णय कोणी समजून घेईल अश्या मनू आणि मुग्धा या दोघीच होत्या. माझ्या दृष्टीकोनातून आता माझ्या जबाबदाऱ्या पूर्ण झाल्या होत्या. आता आस होती स्वतःसाठी जगायची. उतार वयातले ४ क्षण आता मला माझ्या ध्येयपूर्तीसाठी वेचायचे होते. माझा निर्णय झाला होता आणि तो ठाम होता.
"आई, अगं बोलतेस ना तु?" असा मनूचा आवाज आला आणि मग मी भानावर आले. केक कापून झाला होता. सगळे माझ्या बोलण्याची वाट पाहत होते. मी शांतपणे उभी राहिले. "आज तुम्हा सगळ्यांना इथे बोलावण्याचा हेतु एकच आहे; मला तुम्हाला काहीतरी सांगायचं आहे......"

* * * * *

# कल्पवृक्ष

## लेखिका - तनुजा पतकी

पुन्हा एकदा नजर भिरभिरली. सगळी जय्यत तयारी झाली होती. जीवापलीकडील जपलेल्या नात्यांचा, अनुभवांचा कस पहाणारा हा प्रसंग... वेळ जसजशी जवळ येत होती तसतशी हृदयाची धडधड वाढू लागली...
निरोपाचा एकएक क्षण तिला वेगाने भूतकाळात घेऊन जात होता...
ती तापानी फणफणली होती. बाबा कपाळावरच्या पट्ट्या बदलत होते. बहुतेक दोन-तीन दिवस ते झोपलेच नव्हते. “बाबा आहेत नं जवळ, म्हणजे मी लवकर बरी होईन!” तिनी अर्धवट ग्लानीत विचार केला आणि तिला पुन्हा झोप लागली.
गरम गुरगुट्या भात भरवणारी आई, अत्तरात कापसाचा बोळा भिजवून हातावर लावणारे बाबा, वाढदिवसासाठी आणलेला हिरवा ड्रेस, मॅचिंग कानातलं आणि गळ्यातलं, आईचं सगळ्या मैत्रिणींना आग्रह करून खाऊ घालणं, अभिमानानं तिच्याकडे बघणारे बाबा.. ती खरंच नशीबवान होती. फुलासारखे जपणारे आईबाबा आणि त्यांच्या मायाची ऊब तिने स्वप्नं न पहावं तरंच नवल!
नंतर तिला नवीन घर, गच्ची आणि उन्हाळ्यातलं गच्चीवरचं झोपणं आठवलं. बाबांच्या हाताची उशी असायची आणि बाबा आकाशातले सप्तर्षी दाखवायचे - सप्तर्षींपासून जोडलेला ध्रुवतारा तिच्या सगळ्यात आवडीचा!
दूर लुकलुकणारं एखादं विमान. मग बाबा विमानाने लंडनला गेले त्याची गोष्टं. “ बाबा, मला पण पॅरिसला जायचंय”, बाबांचा आयफेल टावरपाशी बसलेला फोटो बघत ती म्हणायची. “गोग्गो, तू सगळं जग फिरशील गं. माझी भिंगरी आहेस तू!” बाबांचं एवढं आश्वासन पुढच्या स्वप्नांमध्ये भरकटायला पुरेसं असायचं. मग गच्चीवरचे विमान, तारे, नक्षत्र आणि चंद्राच्या वेगवेगळ्या कलांमध्ये ती हरवून जायची!
खूपदा तिनी कागदावर सुंदर आकाश रंगवलं होतं. कधी डोंगरांमधून उगवणारा सूर्य तर कधी गर्द निळ्या आकाशातले चंद्र आणि तारे- बरोबर एका झाडावर पिलांना भरवणारी पक्षीण. सगळं फार मनमोहक दिसायचं पण तिनी काढलेला चंद्रावरचा ससा तिला कधी भावलाच नाही. ‘तो जसा चंद्रावर दिसतो तसा मला जमतंच नाही’ ती हिरमुसायची, ’एकदा मी चंद्राच्या खूप जवळ जाईन, तिथून मला तो ससा नीट दिसेल आणि मग माझं चित्रं पूर्ण होईल...’ स्वतःलाच समजावत ती चंद्रात रमून जायची.
शाळा सुरू झाली. उडण्याचं स्वप्नं बघणारे राईट ब्रदर्स तिला फारंच आवडले. “ बाबा, मला असं काहीतरी वेगळं करायचंय. जमेल नं मला?” आणि पुन्हा बाबांचं आश्वासक उत्तर,”तू नक्की करशील गोग्गो! मला खात्री आहे. पण त्यासाठी ध्यास घेवून काम करावं लागतं. नुसतं स्वप्नं बघून चालत नाही.” मग बाबांनी तिला नील आर्मस्ट्रॉंगची गोष्ट सांगितली. चंद्रावरचं पाऊल दाखवलं. भारतातून अवकाशात गेलेल्या राकेश शर्मांचं वर्तमानपत्रातलं कात्रण दाखवलं. इंदिरा गांधींनी त्यांना विचारलं, “ ऊपरसे भारत कैसा दिखता है?” आणि त्यावर राकेश शर्मा ऊत्तरले, “ सारे जहां से अच्छा!”
नंतर स्वतःशीच बोलत म्हणाले, ”फार मोठी माणसं ही! जात, धर्म, प्रांत, देश सगळ्यांच्याच पलीकडे जाऊन ह्यांनी मानवजातीला प्रगत बनवलंय. आयुष्यात काही करावं तर असं!”

ती बाबांकडे बघत होती. जणू त्यांच्या मनातलं स्वप्नं तिच्या डोळ्यात उतरलं. पण ती काही बोलली नाही. “मला खरंच हे जमेल ना?” पहिल्यांदाच तिला शंका आली. स्वप्नं आणि सत्य ह्यातलं अंतर मापण्याची समज तिच्यात आली होती...
मग लग्न, संसार हयात तीचं स्वप्नं हरवून गेलं. तीही नवीन जवाबदाऱ्यांमध्ये रमून गेली.
पण आखीव-रेखीव आयुष्य, नियती आणि स्वप्नं यांचं त्रांगडं सगळ्यांनाच अज्ञात!
आपल्या नवऱ्याचं अवकाशाबद्दलचं आकर्षण आणि कौतुक तिला वॉशिंग्टनच्या ‘एअर ॲण्ड स्पेस’ म्युझियम मध्ये गेल्यावरंच कळलं. पहिल्यांदाच ती भरभरून आपल्या स्वप्नांविषयी त्याच्याशी बोलली. आपल्या बायकोचं नवं रुप बघून त्याला गंमत वाटली. खरं सांगायचं तर एकमेकांच्या आवडी जुळतात हया भावनेनं तो मनोमन सुखावून गेला. तिच्या मनातलं आपल्याला आतापर्यंत कळलंच नाही ह्या विचारानं तो अंतर्मुखही झाला.
नील आर्मस्ट्रॉंगचा स्पेससूट आणि चंद्रावरच्या दगडांचे तिनी खूप फोटो काढले. आपण तो स्पेससूट घातलाय आणि बाबा आपल्याकडे कौतुकाने बघताहेत ह्या कल्पनेत ती गढून गेली.
नंतर सगळंच जणू ठरवल्यासारखं..तिचं अंतरिक्ष संशोधन क्षेत्रात वैज्ञानिक होणं, आवडीचं काम मिळणं, तिचं अवकाशाचं वेड, अफाट वाचन, काहीतरी करून दाखवण्याची जिद्द आणि पंतप्रधानांनी चंद्रावर भारतीय अंतराळवीर पाठवण्याची घोषणा करणं..
‘आपण चुकत तर नाही ना? आपल्या स्वार्थीपणाचा हा अतिरेक आहे. सगळ्यांना सगळं मिळत नसतं. मुलं, नवरा, संसार हे सगळं सोडून मनात अशा गोष्टी येणं हे पापंच!’, तिनं मनातलं द्वंद्व झटकून टाकायचा प्रयत्न केला.
लपूनलपून ती सुनीता विल्यम्स, कल्पना चावला ह्यांच्या गोष्टी वाचायला लागली.
"आई, आजकाल तुझी चांदोबाशी फारच गट्टी झालेली दिसतेयं. " आईच्या bedtime story मध्ये वारंवार येणारा moon मुलीला जाणवायला लागला होता.
"मी चंद्रावर गेले तर तू वेळेवर नीट जेवशील ना बाळा?" आपल्याच नादात तिनी मुलीला विचारलं. "आई, तू जाऊन ये मग आपण family trip काढू.", मुलगी हसत म्हणाली.
"हो ना. मलाही आता युएस-युके चा वीट आलाय. space trip तो बनती है." नवऱ्यानेही मनातली भीती लपवत मुलीला दुजोरा दिला.
"खरंच चालेल तुम्हाला? मी जाऊ ?"
"तुला तुझं स्वप्न पूर्ण करायला मिळतंय. मी का अडवेन? तू जाऊन ये. आम्ही वाट बघू तुझी."
आणि आज तो दिवस आला होता. ती रॅकेटच्या क्र्यू मॉड्यूलमध्ये बसली होती. मिशनरूममध्ये बसलेला नवरा आणि मुलगी तिला स्क्रीनवर दिसत होते. कदाचित ही शेवटचाच भेट! “सुखी रहा बाळा! यशस्वी हो! माहेरी जावून मी लवकर परत येईन हं!" भरलेल्या डोळ्यांनी ती बोलली.
डाऊन काउंटींग सुरू झालं होतं..
"आईबाबा, मी येतीए तुम्हाला सांगायला..तुम्ही आपल्या गोग्गोसाठी लावलेला कल्पवृक्ष कसा बहरून आलाय ते! पण मी परत जाणार आहे हं. माझं बाळ माझी वाट पहात असेल..",
तिच्यातली आई स्वतःशीच बोलली…

* * * * *

# शिकार

## लेखिका - नीलिमा राव

खळ्ळ-लोखंडी जाड कांबी असलेल्या जड दरवाज्याचा बंद करुन त्यावर मोठे लोखंडी कुलुप लावल्याचा आवाज आला.आता कशाचीच भीती किंवा राग वाटत नसें. मन सुन्न झाले होते - मेले होते म्हणा ना - ना राग ना लोभ - अहल्या- जड शिळा.
एका वर्षाचा बोलपट नजेरे समोरुन तरळत गेला.
स्वछंदपणे बागडणारी मी- तरुणी - सर्वांनी हेवा करावा असें देखणे रुप. लांब सडक केस - त्यावर मोगरा किंवा चमेली माळून सुंदर हेलकावे खाणारा लांब सडक शेपटा.त्याचा भार संभाळणारा सुंदर शेलाटा बांधा माझा स्वत:चा आवडता रंग आभाळी निळा . तोच तलम शिफॉनच्या साडीचा रंग, त्याला मॅचींग लोंबणारे लोलकाचे कानातले व एक मोत्याची सर. उत्तमशिलाईचे पोलके शरीर सौष्ठव वाढवित असे. साधीच रहाणी पण देवाने ख़ैरात केलेल्या सौंदर्याने खूपच जिव घायाळ होत असत.
त्यातच एका दिवशी झुंजमुंज झालं. रातराणीच्या सुगंधाचा दरवळ कमी होताच प्राजक्ताने पखरण केली. कळ्या उमलू लागल्या ,झाडांची पाने सळसळ करु लागली. स्वच्छ निरभ्र आकाशांत साथीने विहार करण्यासाठी पक्ष्यानी किलबिलाट

सुरू केला. कॉलेज मध्यें प्रोजेक्ट संपवायचे होते म्हणून लगबगीने चालत असता - अचानक तो मोटरबाईक घेउन आडवा उभा आला. साक्षात, मदन . कॉलेजमधें देखणा, खेळपटू, आभ्यासात व इतर विभागात सर्वप्रथम - हे व्यक्तिमत्व दत्त म्हणून समोर मिश्कील हसत उभे होते. माझी त्रेधा तिरपीट उडालेली. शांतपणे निरखीत होते. माझे हुदय धडधडूं लागले की ह्याला कळते की काय ह्या संभ्रमाने मी बावरून गेले. तो विचारीत होता - कॉलेज पिकनीकला येणार का? भानावर आल्यावर, प्रश्न ध्यानात आला. घरांतून परवानगी कशी मिळवाची ह्याचा विचार भेडसावीत असताना -अचानक तोंडातून हो - असें निघाले. त्याला काय रंग आवडत असेल- विचार करण्यात ऐक दिवस गेला व तो पिकनीकचा दिवस उजाडला . आई-वडिलांची परवानगी ही भलीमोठी परिक्षा होती पण मैत्रीण कामी आली.ती पण येणार आहे हे ऐकताच घरच्यानी-हो म्हंट्ले. मन मोरपीस झाले होते. सर्व सरंजाम संभाळत मी कॉलेजच्या पोर्चमधें पोहचताच- अती सुंदर- हे शब्द कानावर पडले. तिरक्या नजरेने बघताच त्याच्या डोळ्यातील पंसतीची पावती फाडल्याचा अंदाज आला.

सर्व कॉलेज ठरलेल्या पिकनीकला. दोन पक्षी किलबिल करत निराळ्या दिशेने,वेगळ्याच स्थळी. कळत होते, हे बरोबर नाही पण तारूण्याचा मद इतका चढलेला की सारासार विचार करण्याचि, बुध्दीची धार, कधीच बोथट झाली होती. त्याच्या मोबाइलवर “ रिमझिमके तराने लेके आयी बरसात” व “ही गुलाबी हवा-वेड लावीजिवा ” ही व अशी गाणी मन स्वच्छंद करीत होते - शिकारी सावज शिताफीने टिपत होते. हळुवार स्पर्श व प्रेमाची कुजबुज ह्यांनी सर्व भावना उफाळून आल्या व भानावर आल्यावर एकच कळले, मी सर्व काही हरवून बसले होते. ह्याच भावनेतून सावरून उठले असता त्याचा संतप्त चेहरा कांही वेगळेच सांगून गेला.क्षणातला मदन, राक्षस झाला होता -व विचारत होता - काय ग मी कितवा?- मला काही कळेच ना व जेंव्हा कळले तेंव्हा त्याच्या नीच वृत्तीचा आणि माझ्या मूर्खपणाचा व आपण कश्या, शिकार झालो आहोत ह्याचा प्रत्यय आला. फळांची सुरी होती व तिच माझ्या सुडाची, साक्षीदारीण झाली. - मी इतक्या जोराने वार केला की तो तिथल्या तिथेच गत:प्राण झाला. कशीतरी धड्पडत -कोलमडत गावापाशी आले व घरी पोहोचले. पुढ्चे १५,२० दिवस कसे काढ्ले ते माझे मलाच ठाउक पण निसर्गाने आपले कार्य बरोबर बजावले होते. - मला दिवस गेले आहेत हे फक्त आईच्या चाणक्ष नजरेतून सुटले नाही. मला ताबडतोब गावाला पाठविण्यात आले पण न्यायालयाचे हात लांब असतात. मला अटक झाली. सर्व नातेवाईक दूषणे देऊन मोकळे झाले . फक्त आईची मायेची पाखर होती व ज्याचा काहीच दोष नव्हता तो जीव पोटात वाढ्त होता. तुरूंगाच्या चार भिंतीत माझे शिक्षण सुरु होते. व मी जगाच्या तुच्छ नजरा झेलत जीवन पुढे ढकलत होते. सर्व जगावरचा , प्रेमावरचा विश्वासच उडाला होता. मातृत्व काय असते हे कळण्या आधीच ते लादले गेल्याचे दु:ख व चीड होती. जेलमध्ये इतर पुरूषांच्या लाघट नजरा व आता ही आपलीच जहागीर हे त्यांच्या नजरेतील भाव, क्रोधीत करीत पण पुढच्या क्षणी हताश पण करीत.

सर्व न्यायालीन यंत्रणा घराच्यानी कामास लावण्या कारणाने हा खून स्वरक्षणासाठी केलेला आहे हे सिध्द झाले व सुटकेची तारीख व दिवस नक्की झाला.मनाची घालमेल झाली होती व घरी जाण्याची ओढ असली तरी एक भीती मनात घर करून होती.-जगाचा व आपल्या कुटुंबाच्या उपहासाच्या नजरा. भाऊवहिनीने तर कधीच संबंध तोडला होता. बाबा व इतर गप्प असत. तुरूंगात भेटण्यास आले तरी - कधी वेळ संपते हे बघत असत. अत्याचाराने मनावर सुध्दा ओरखडे उठलेले होते. आणी ते आपल्या माणसांकडून होत होते. जे जगासमोर आणता येत नव्हते.

सकाळ होताच तयारी करुन घरच्यांची वाट बघत होते. पुन्हा एकदा नजर भिरभिरली . जिवनापलीकडील जपलेल्या नात्यांच्या अनुभवांचा कस पहणारा, हा क्षण-

वेळ जशी जशी जवळ येत होती, ह्दयाची धडधड वाढू लागली- बाबांची पांढरी गाडी दृष्टीक्षेपात आली. मनाला घरी जाण्याचे व आपल्या घरटांतील ऊबेचे वेध लागले होते. बाबा कोरड्या स्वरात ड्रायवरला सांगत होते--

डाव्याबाजुचा रस्ता घे - सरळ महीलाश्रमात जातो . त्यांना हा आपल्या घराण्यावर लागलेला कलंक -मी - त्यांच्या जीवनात नको होते - माझी शिकार झाली होती.

* * * * *

# हे बंध रेशमाचे !

## लेखिका - स्मिता बर्वे

नऊ वाजत आले होते, अधीर मनाने निशा विवेकची वाट पहात होती. डोक्यात विचारांचे थैमान सुरू होते. आपण घेतलेला निर्णय बरोबर आहे की चूक हेच तिला अजून समजत नव्हते. ती आणि विवेक मिळून माईशी आज बोलणार होते. आश्रमाकडे येणारी वाट ती आज नव्याने न्याहाळत होती.

निशाला आठवतंय तेव्हापासून ती आश्रमातच आहे. सनाथ आणि अनाथ ह्यांतील फरकच तिला माहीत नाही. इथेच शिक्षण झाले आणि ती माईच्या हाताखाली आश्रमाचा कारभार पाहू लागली. माईची उत्तराधिकारी म्हणूनच तिच्याकडे सगळे बघत

होते. आश्रमात राहून तिच्यात एक प्रकारचा कोरडेपणा आला होता. प्रेम, ममता, आपलेपणा ह्या सगळ्या भावना बोथट झाल्या होत्या. जे काही प्रेम वाटे ते माईबद्दलच, त्यात सुद्धा प्रेमापेक्षा आदरच जास्त होता.

एक दिवस ती ऑफिसमध्ये असताना एक मोठी गाडी आश्रमासमोर येऊन थांबली. त्यातून एक मध्यमवयीन रुबाबदार माणूस उतरला. हे ही निशाला नवीन नव्हते. आठवड्यात एकदा तरी कोणीतरी चौकशीसाठी यायचेच. त्याने त्याचे व्हिजिटिंग कार्ड पुढे केले. त्याच्यावर एक नजर टाकून निशाने आश्रमाची माहिती द्यायला सुरुवात केली. विचार करून सांगतो म्हणून तो गृहस्थ निघून गेला. आज पहिल्यांदाच निशाला कोणाबद्दल तरी आपलेपणा वाटला होता. हा माणूस तिला इतरांपेक्षा वेगळा वाटला. त्याच्या बोलण्यातून त्याची अगतिकता जाणवत होती. तिची नजर पुन्हा पुन्हा व्हिजिटिंग कार्डकडे जात होती. विवेक हे नाव तिच्या मनावर कोरले गेले. पुन्हा आला तर बघू असे म्हणून तिने सगळे विचार बाजूला केले आणि कामाला लागली.

दोन-चार दिवसांनी पुन्हा विवेक आला. पुन्हा चौकशी करू लागला आणि…... परत चौथ्यांदा त्याला चौकाशीसाठी आलेला बघून निशाला राग अनावर झाला, ती फट्कन म्हणाली, "इतक्या शंका आहेत आणि इतकी काळजी आहे तर मग घरीच ठेवा ना! आश्रमाची चौकशी कशाला करता आहात? बायको सासूचे करायला तयार नाही वाटते?"

"तुम्हाला काय समजणार आईची माया! तिच्यापासून तुटण्याच्या यातना! ज्याचं जळत ना त्यालाच कळतं!" दुःखी स्वरात विवेक म्हणाला.

त्याच्या शब्दांनी निशाच्या डोळ्यांत पाणी आले, भरल्या आवाजात ती म्हणाली, " बरोबरच आहे तुमचे, अनाथ मुलीला कशी कळणार आईची माया!"

विवेकने चमकून निशाकडे पाहिले. तिचा दुःखी चेहरा त्याला खूप काही सांगून गेला. पुढे काही न बोलताच तो निघून गेला. गाडी थांबवून त्याने आश्रमात फोन लावला आणि निशाला सॉरी म्हणाला. तिचा मोबाईल नंबर मागितला. निशाने सुद्धा सहज दिला.

झालेल्या चुकीची टोचणी दोघांनाही लागली होती.

विवेक... खरं तर नावाप्रमाणेच शांत आणि संयमी होता. असे शब्द आपल्या तोंडून कसे गेले ह्याचे त्याला आश्चर्य वाटत होते.

आईवर त्याचे नितांत प्रेम होते. वडिलांच्या पश्चात तिने त्याला उत्तम रीतीने वाढविले होते. वीणाच्या येण्याने एक सुंदर चित्र पूर्ण झाले होते. घर आणि कंपनीत तिची उत्तम साथ होती.

एका अपघाताने त्याचे सारे विश्व उध्वस्त करून टाकले होते. पत्नी वीणा आणि दोन्ही गोंडस मुले जागच्या जागी गेली होती आणि हे प्रत्यक्ष बघणाऱ्या आईला मानसिक धक्का बसला होता. तिचा प्रेमळ चेहरा निर्विकार झाला होता आणि मन शुष्क. विवेकला स्वतःला सावरून आई आणि कंपनी दोन्हीकडे लक्ष देताना दमछाक होत होती.

आईचा आजार दिवसेंदिवस वाढत होता....काय आणि कसे करावे असे पर्याय शोधत असतानाच तो वृद्धाश्रमात गेला होता.

दोन तीन दिवस खूप विचार करून विवेकने निशाला फोन केला.

"निशाताई माझी खूप मोठी चूक झाली. नकळत दुखावले मी. परत एकदा माफी मागतो."

" साहेब माझे ही चुकलेच की, मी ही नको होते असे बोलायला. माफ करा. "

"निशाताई एक विनंती……. माझ्या घरी याल का? प्रत्यक्ष भेटून तुम्हाला काहीतरी विचारायचे आहे."

" माईना विचारून सांगते." निशाने फोन ठेवून दिला.

वेळ ठरवून निशा विवेकच्या घरी गेली. त्याच्या आईला पाहून आपल्या आयुष्यातील कमी तिला प्रकर्षाने जाणवली. घर पाहून झाल्यावर कॉफी घेत असताना विवेकने निशासमोर एक प्रस्ताव ठेवला. तिच्या कानांवर तिचा विश्वासच बसत नव्हता. लगेच निर्णय देणे शक्यच नव्हते, विचार करून सांगते असे म्हणून ती परत आश्रमात आली.

दोन तीन दिवस विचार करून तिने विवेकला सांगितले की तुम्ही प्रत्यक्ष येऊन माईशी बोला. त्यांचा होकार असेल तर माझा ही होकार असेल....कारच्या आवाजाने तिची तंद्री भंग पावली.

प्रसन्न चेहऱ्याने विवेक समोर उभा होता.

दोघेही माईकडे गेले.

निशाने ओळख करून दिली.

माई म्हणाल्या, " तुमची कंपनी आणि तुम्ही ह्या बद्दल ऐकले होते. आज प्रत्यक्ष ओळख झाली. आज मला भेटण्याचे प्रयोजन?"

विवेकने सगळी परिस्थिती माईना सांगितली आणि हात जोडून विनंती केली, "तुम्ही परवानगी दिलीत तर निशाला माझी धाकटी बहीण म्हणून घरी नेण्याची इच्छा आहे. मी सगळ्या कायदेशीर बाबी पूर्ण करीन. राखी पौर्णिमा आमच्या घरी राखी बांधून साजरी व्हावी अशी इच्छा आहे."

माईना काय बोलावे ते कळेना. निशा लहान असताना तिला कुणीतरी दत्तक घ्यावे, तिला घर मिळावे म्हणून त्यांनी खूप प्रयत्न केले होते आणि आज अचानक तिच्या नशिबाचे दरवाजे उघडले होते.

पुन्हा एकदा नजर भिरभिरली. सगळी जय्यत तयारी झाली होती. जीवापलीकडील जपलेल्या नात्यांचा, अनुभवांचा कस पाहाणारा हा प्रसंग... वेळ जसजशी जवळ येत होती तसतशी हृदयाची धडधड वाढू लागली..........

निशाकडून राखी बांधून घ्यायला विवेक उत्सुक होता. फक्त आता आईने तिला आपले मानायला हवे होते.

निशाने घरांत पाऊल टाकले आणि आई समोर आली. "आई " म्हणत  निशाने मिठी मारली आणि......... आईचा चेहरा पुन्हा वात्सल्यमय झाला.
हे अनोखे रेशमी बंध पाहून माई कृतकृत्य झाल्या.

* * * * *

# बंध नात्यांचे

## लेखिका - रुचिता बोधनकर

पुन्हा एकदा नजर भिरभिरली. सगळी जय्यत तयारी झाली होती. जीवापलीकडील नात्यांचा, अनुभवांचा कस पाहणारा हा प्रसंग..... वेळ जसजशी जवळ येत होती तसतशी हृदयाची धडधड वाढू लागली . अमेयची खोली फुगे, फुलं, कार्टून्स यांनी सजवली होती. तशा सूचना डॉ. बापट यांनी आपल्या स्टाफला दिल्या होत्या. एकदा खोलीभर नजर टाकुन डॉ. आपल्या केबिन मध्ये परत आले. आजपर्यंत अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीपणे करणारे डॉ . बापटांचे हात मात्र आज थरथरत होते. कारणही तसेच होते. त्यांना आपल्या मुलावर शस्त्रक्रिया करायची होती. नकळतच मागील नऊ वर्षांचा काळ त्यांच्या डोळ्यासमोर आला.
नऊ वर्षांपूर्वी पेडिऍट्रिक आय सर्जन असणारे डॉ. सचिन बापट ह्यांचा विवाह डॉ. राधा कारखानीस ह्या पेशाने स्त्रीरोगतज्ञ असणाऱ्या मुलीशी झाला. आपापले व्यवसाय सांभाळून दोघांचाही गोडीगुलाबीचा संसार सुरु होता. लग्नानंतर दीड दोन वर्षांनी डॉ. राधा गरोदर असल्याची चाहूल लागली. आनंदीआनंद झाला. दिवसभरल्यावर डॉ. राधाने एका गोंडस  मुलाला जन्म दिला .सगळे आनंदात सुरु होते. अमेय दिवसागणिक वाढत होता .त्याचे संगोपन आणि आपला व्यवसाय ह्याची छान सांगड डॉ. राधाने घातली होती. पण नियतीच्या मनात वेगळेच होते. एके दिवशी डॉ . राधाला  आपल्या उजव्या स्तनात गाठ जाणवली. डॉ. असल्याने तिला शंका आली. लगेच सगळ्या चाचण्या करण्यात आल्या . त्यात ब्रेस्ट कॅन्सरचे निदान झाले. लास्ट स्टेजचा कॅन्सर होता. जणू आभाळच कोसळलं ह्या दाम्पत्यावर . मोठमोठ्या डॉक्टर्स ना दाखवून डॉ. राधा ह्यांच्यावर  उपचार सुरु करण्यात आले. व्यवसाय, घर, अमेय आणि डॉ. राधा ह्या साऱ्यांमध्ये डॉ. सचिनची फारच दमछाक होत होती. तरी अमेयची जबाबदारी त्यांची आई आणि डॉ. राधाचे आई वडील  ह्यांनी सांभाळली होती . सहा सात महिने कॅन्सरशी झुंज देऊन आणि अवघ्या एक सव्वा वर्षाच्या अमेयला मागे सोडून डॉ. राधाने ह्या जगाचा निरोप घेतला. डॉ. राधाच्या जाण्याने डॉ. सचिन ह्यांच्या आयुष्यात एक रितेपण निर्माण झाले. आपल्या भावना बोलून व्यक्त करता येत नसल्या तरी  आईची कमी अमेयला पण जाणवत होती. अमेय सारखा रडारड चिडचिड करायचा. दोन्ही आजी आणि आजोबा अमेयला सांभाळत होते. अखेर अमेयकडे पाहून डॉ. सचिन ह्यांनी स्वतःला सावरले. हॉस्पिटल आणि अमेय ह्यात गुंतवून घेतले. काही वर्षांनी आई आणि सासू सासरे ह्यांनी सुचवलेला दुसऱ्या लग्नाचा प्रस्तावही डॉक्टरांनी फेटाळून लावला . अमेय आता शाळेत जायला लागला होता. त्याच्याकडे पाहून डॉ. राधाच्या जाण्याच्या दुःखाची धार थोडी बोथट झाली होती. डॉ. सचिन बापट ह्यांचे नावही आता प्रथितयश डॉक्टरांमध्ये घेतले जात होते. डॉ. बापट शस्त्रक्रिया करणार म्हणजे ती यशस्वी होणारच असे जणू समीकरणच झाले होते. डॉ. सचिन आणि अमेय ह्यांच्या आयुष्याची गाडी आता रुळावर आली होती.
बघताबघता अमेय सात वर्षांचा झाला . आजकाल अचानक अमेय ' बाबा मला कधीकधी नीट दिसत नाही, डोळ्यांची आग होते, डोळे दुखतात, पाणी येतं ' अशा तक्रारी करायला लागला. हळूहळू ह्या तक्रारींचं प्रमाण वाढत होते. शाळेतील मॅडम पण म्हणाल्या अमेयला फळ्यावरचं नीट  दिसत नाही. अनुभवी डॉ. सचिनच्या मनात शंकेची पाल चुकचुकली.त्यांनी लगेच अमेयच्या सगळ्या चाचण्या करवून  घेतल्या . शेवटी त्यांची भीती खरी ठरली. नियतीने पुन्हा  एकदा डाव साधला होता. अमेयला Retinal  Cancer हा लाखात एका मुलामध्ये आढळणारा कॅन्सर झाला होता आणि तोही दोन्ही डोळ्यांमध्ये. डॉ. सचिन पुन्हा एकदा हादरले.त्यांच्या माहितीतल्या मोठातल्यामोठ्या डॉक्टरर्सना त्यांनी अमेयचे केस पेपर्स दाखवले. सगळ्यांनी एकच सांगितले .लवकरात लवकर शस्त्रक्रिया करावी लागेल. पण शस्त्रक्रियेनंतर देखील त्याला दिसेल कि नाही याची शाश्वती नाही .कदाचित कायमचे अंध्यत्व येऊ शकेल. डॉ. सचिन पुरते कोलमडून गेले. डॉ.राधाची त्यांना प्रकर्षाने आठवण येतं होती. त्यांची कमी जाणवत होती. शेवटी बऱ्याच डॉक्टरांशी बोलून डॉ. सचिन ह्यांचे व्यावसायिक मित्र असणारे डॉ. जोसेफ ह्यांनी शस्त्रक्रिया करायची असे ठरले. डॉ. सचिन ह्यांनी आपल्या सहकारी डॉक्टर्स आणि समुपदेशकाच्या मदतीने अमेयची मानसिक तयारी करवून घेतली.पण हे सारे करताना त्यांचे हृदय तीळ तीळ तुटत होते. आपल्याच मुलाला तू आंधळा पण होऊ शकतो हे सांगण्यासारखं दुसरं दुर्दैव एका बापासाठी नाही. मन घट्ट करून डॉ. ह्या सगळ्याला सामोरे जात होते. लाडक्या नातवाची अशी अवस्था पाहून आजी आजोबा देखील खचून गेले होते.
शस्त्रक्रियेचा दिवस ठरला. पण आदल्या दिवशीपासूनच पावसाला सुरवात झाली. जोर वाढतच होता. शस्त्रक्रियेच्या दिवशी सकाळपासूनच धुवाधार पाऊस होता.सगळीकडे पाणी भरलं होतं.वाहने देखील पाण्यात अडकून पडली होती

त्यामुळे वाहतूक जागच्याजागीच थांबली होती. पावसाचा जोर पाहता आपण आता हॉस्पिटल मध्ये पोहचू शकणार नाही हे डॉ. जोसेफ ह्यांच्या लक्षात आलं आणि त्यांनी तसं डॉ. सचिन ह्यांना कळवलं. आता शस्त्रक्रियेचे काय असा यक्ष प्रश्न उभा राहिला . तुम्हीच शस्त्रक्रिया करा असं डॉ. जोसेफ ह्यांनी सुचविले. पण आपल्याच मुलावर शस्त्रक्रिया करायची ह्या विचाराने डॉ. सचिन ह्यांच्यातील वडील भांबावून गेले. शेवटी खूप विचार आणि हिम्मत करून आपणच शस्त्रक्रिया करायची हे त्यांनी ठरवलं . कारण पाऊस ओसरून डॉ. जोसेफ येईपर्यन्तचा कालावधी त्यांना आता दवडायचा नव्हता . त्यांनी लगेच आपल्या स्टाफला सूचना केल्या की अमेयची खोली फुलं, फुगे, कार्टून्स विशेषतः त्याचं आवडीचं कार्टून मिकी माउस ह्यांनी सजवावी.ह्यामागील उद्देश हा की अमेयने शस्त्रक्रियेआधी सगळी सजावट , फुलं, फुगे, इत्यादी सगळं थोडक्यात आनंद , उल्हास , प्रसन्नता , विविध रंग सगळं सगळं आपल्या डोळ्यात साठवून घ्यावं. जर दुर्दैवाने अमेयला अंध्यत्व आलेच तर तो हे सगळं डोळ्यात साठवूनच अंधारात जाईल.
इतक्यात केबिनच्या दारावर टकटक झाली आणि डॉ. सचिन विचारांमधून बाहेर आले. हेड नर्स सांगायला आली होती की अमेयला ओ.टी. मध्ये नेण्यात आले आहे. डॉ. सचिन ह्यांच्या हृदयाची धडधड वाढली. नेहमीप्रमाणे देवाचे नामस्मरण करून ते केबिनच्या बाहेर पडून ओ टी मध्ये आले. एकवार अमेयकडे पाहिलं. आपल्यातील वडील कुठेतरी वरचढ होतं आहेत की काय असं त्यांना जाणवलं. त्यांनी डोळे मिटले .त्यांना त्यांच्या वैद्यकीय शिक्षणादरम्यान शिकवलेलं आठवलं.समोरची व्यक्ती हि जरी तुमची नातलग असेल तरी आधी तो तुमचा रुग्णच आहे नातलग नाही. हे आठवून आपण आता अमेय नावाच्या रुग्णावर शस्त्रक्रिया करणार आहोत आपल्या मुलावर नाही हे मनाशी पक्कं करून त्यांनी अमेयवर शस्त्रक्रिया करायला सुरवात केली. काही तासांच्या अथक प्रयत्नानंतर शस्त्रक्रिया यशस्वी होते.पण अमेयची दृष्टी कायम आहे की नाही हे मात्र डोळ्यांवरील पट्ट्या काढल्यावरच स्पष्ट होणार होतं . अमेयला पुन्हा सजवलेल्या खोलीत आणलं गेलं. आता अमेयच्या डोळ्यावरील पट्ट्या काढण्याचा दिवस येतो. डॉ. सचिन अमेयच्या समोर उभे असतात . त्यांचे सहकारी डॉक्टर हळूहळू पट्टी काढायला सुरवात करतात .डॉ. सचिन प्रचंड कासावीस झालेले असतात.अमेय सांगितल्याप्रमाणे हळूहळू डोळे उघडतो आणि समोर उभ्या असलेल्या आपल्या बाबांना पाहून ' बाबा' अशी हाक मारतो. हे ऐकताच डॉक्टरांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागतात. ते धावत जाऊन अमेयला मिठीत घेतात . मुलगा आणि वडील ह्यांचे हे मिलन तेथे उपस्थित प्रत्येकजण डोळेभरून पाहत असतो.

* * * * *

# आणि तो क्षण

## लेखिका - मानसी टेम्बेकर

बाहेर धो-धो पाऊस . रात्रीचे बारा वाजून गेले तरी गणेशचा पत्ता नव्हता .सुनिताच्या जीवाची घालमेल. पोटात अन्नाचा कण नाही . तिने एकदा आशा ,रोहन आणि मोहित कडे पाहिले .थकलेली पोरं अर्धपोटी ही शांत झोपली होती. तितक्यात झोपडीच्या दरवाजावर ठकठक ऐकू आली.तिची धडधड वाढली. दरवाजात पोलीस पाहून तर तिच्या काळजात चर्र झाले . इन्स्पेक्टरनी विचारलं , ,"तुम्ही गणेश सावंतांच्या कोण ?"सुनिता म्हणाली,"म.. म . . मी त्याची बायको. " तिने चाचरतच उत्तर दिले. "कुठे आहे तो?"तिने विचारले. इन्स्पेक्टर म्हणाले ,"मानखुर्द जवळ एका घरात खून झालाय त्याचा . चला ,तुम्हाला पोलीस स्टेशन ला चलावे लागेल ."तिच्या पायाखालची जमीनच सरकली.हे सर्व काय होतंय हे कळायच्या आत एका लेडी पोलीस ने तिला दटावले आणि गाडीत बसण्याचा इशारा केला. या गडबड गोंधळाने पाच वर्षांची आशा उठली .तिलाही क्षणभर काही सुचेना . ती धावत जाऊन आईला बिलगली . सुनिताने तिला जवळ घेतले आणि ती परत येईपर्यंत रोहन आणि मोहित ला सांभाळ एवढं बोलून सुनिता गाडीत बसली. तिचे अश्रू थांबतच नव्हते पण ना अश्रू पुसायला कोणी होत ना पाठीवर धीराचा हात द्यायला.
आईवडिलांविना मावशीकडे गरिबीत वाढलेली सुनिता . रंग गोरा ,पाणीदार डोळे ,राहायला नीटस ,अगदी पाहताक्षणी आकर्षित करणारी . गणेश तिच्याच गल्लीत राहणारा मुलगा .शिक्षणात जेमतेम पण तरी स्वबळावर विश्वास असणारा आणि तिच्यावर जीवापाड प्रेम करणारा . त्याचा हाच विश्वास तिलाही भावला . दोघांचं लग्न झालं . गणेशची दारूभट्टीत नोकरी पण व्यसन असं नाही आणि सुनिता चार घरची धुणी भांडी करायची. दोघांच्या मिळकतीत संसाराचं गाडं चालू होतं. एक-दीड वर्षांतच आशाचा जन्म झाला खरा पण गणेश थोडा निराशला . मग सुनिताला परत दिवस गेले . खरतर रोहनच्या जन्माने आनंदीआनंद झाला. दोघांनी खूप स्वप्न ही पाहिली होती पण त्या स्वप्नांवर पाणी फिरलं. रोहनला फुफुसाचा विकार होता. डॉक्टरांनी ऑपरेशन सांगितलं होतं . खरंतर तो खर्च त्यांच्या आवाक्याबाहेरचा होता. पण तरी गणेशने हार मानली नाही . डॉक्टर ,ट्रीटमेंट ,औषध यात ते पदरचे सर्वच गमावून बसले होते.याच दरम्यान गणेशला तात्या भाई भेटला . पैशाच्या चणचणीत असलेल्या गणेशकडून तो काही-बाही कामं करून घ्यायला लागला.गणेशच दारू पिणं ही वाढलं होतं. आता सुनिताच्या पदरी मोहन ही होता. पदरी तीन पोरं आणि गणेशचा काही ठावठिकाणा नसायचा .

सुनिताने त्याला वेळोवेळी खूप समजावयाचा आणि संसार सावरायचा प्रयत्न केला आणि आज हा दिवस उजाडला होता.अजून ही बाहेर पाऊस पडतच होता. गाडी पोलिस स्टेशनमध्ये पोहचली . गणेशची डेड -बॉडी पाहून तिने टाहो फोडला पण ढगांच्या गडगडाटात तिचा आवाज आणि तिचं अस्तित्व विलीन झालं होतं .
पुढे दीड वर्ष सरलं . एकेक दिवस लोकलमध्ये भीक मागून, सुनिता मोठ्या मुश्किलीने दिवस ढकलत होती . पोलिसांची तपासचक्र चालू होती ती वेगळीच . एकट्या बाईवर पडणाऱ्या पुरुषांच्या नजरा ,तीन मुलांची जबाबदारी यात तिची फरफट होत होती . हा लढा तिला एकटीने लढणे शक्य नव्हते . तिला या चक्रव्यूहातून बाहेर पडायचे होते. उद्या गणेशला जाऊन दोन वर्ष होणार . बस .. उद्याचा दिवस .. तिने मनाशी विचार पक्का केला . सकाळी तिने पोरांना उठवले आणि रोजच्या प्रमाणे त्यांना घेऊन दादर स्टेशनवर पोहोचली . स्टेशनवर बिस्किटाचे पुडे विकत घेतले आणि प्रत्येकाच्या हाती एकेक पुडा आणि चॉकलेट दिले . हेच काय ते रोजच्यापेक्षा वेगळं होतं आईने दिलेल्या खाऊचा आनंद पोरांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता खरा पण त्यांना त्याच्यावर कोसळणाऱ्या संकटाची पुसटशी ही कल्पना नव्हती. इतक्यात ९. १७ ची चर्चगेट फास्ट लोकल फलाटावर आली. गाडी पकडण्यासाठी एकच गोंधळ उडाला.सुनिताही तीन पोरांसकट कशीबशी ट्रेन मध्ये घुसली.तिने आशाला रोहन आणि मोहित ला घेऊन आत जायचा इशारा केला .खरंतर तिच्या या वागण्यातले वेगळेपण आशाला जाणवत होते ;ती मूकपणे आईकडे पाहत होती . तिची ही घालमेल सुनिताला ही जाणवत होती पण तिच्याशी नजर मिळवायची हिम्मत सुनितात नव्हती. गाडीने वेग घेतला होता . सुनिताची पुन्हा एकदा नजर भिरभिरली . मुलं आत डब्यामध्ये बिस्कीट खाण्यात दंग होती . सगळी जय्यत तयारी झाली होती . जीवापलीकडे जपलेल्या नात्यांचा, अनुभवांचा कस पाहणारा हा प्रसंग .. वेळ जसजशी जवळ येत होती तसतशी हृदयाची धडधड वाढू लागली .. तिने मन घट्ट केले , एकदा शेवटचे मुलांकडे डोळे भरून पाहिले आणि मनोमन त्यांची माफी मागून स्वतःला लोकल बाहेर झोकून दिले. डब्यामध्ये एकच गलका झाला .. आरडाओरड सुरु झाली. कोणाला काही कळण्याच्या आत तिने स्वतःला संपवले होते . पोरांसाठी तिचा जीव तुटत होता खरा पण भविष्यातल्या अंधकाराने तिला पुरते घेरले होते .

* * * * *

# बंदिनी

## लेखिका - अजिता पणशीकर

पुन्हा एकदा नजर भिरभिरली, सगळी जय्यत तयारी झाली होती. जीवापलीकडील जपलेल्या नात्यांचा, अनुभवांचा कस पाहणारा प्रसंग..... वेळ जसजशी जवळ येत होती तसतशी हृदयाची धडधड वाढू लागली.....
···.आणि नेमकं हेच होऊन चालणार नव्हतं. असं कधीच घडलंही नव्हतं आजपर्यंत. "शांत हो, शांत हो" , ती स्वतःला सतत सांगत होती. डॉ. आकांक्षा हे नाव सर्जिकल ऑनकॉलॉजी मध्ये नावाजलेले. कित्येक लोक आशेने, आपलं सर्वस्व अर्पण करून आपल्या प्रिय व्यक्तीसाठी आर्जव करत असत. आणि आज···. ऑपरेशन थिएटर तयार होतं पण ती तयार नव्हती. विचार तिला भरकटत घेऊन जात होते···.
"आकांक्षा, I really love you". पुन्हा, पुन्हा योगेशचा आवाज कानात घुमत होता. मला नं तुझं हे स्पिरिट खूप आवडतं. हे जोपासीन मी आयुष्यभर. सांग ना, आवडतो का मी तुला? तुझ्या तोंडून एकदा ऐकायचंय मला."
योगेश नेहेमीच अभ्यासाला यायचा तिच्या भावाकडे, अनिकेतकडे. राजबिंडा वगैरे नव्हता, पण स्मार्ट होता. काहीतरी लाघवी होतं खरं त्याच्यात. त्या दोघांचा अभ्यास कमी आणि टाइमपास जास्त. त्यांना म्युझिकची खूप आवड असल्याने सतत गाणी चालत. "तुमको देखा तो ये खयाल आया ......" "जीवनात ही घडी अशीच राहू दे....." हे वाजवायचे गिटार आणि कीबोर्ड वर प्रयत्न चालू असायचे. आकांक्षाला मेडिकलच्या अभ्यासातून फुरसत मिळत नसे. क्वचित कधी मूड आणि वेळ दोन्ही असलं की त्या तिघांच्या गप्पा खूप रंगायच्या. तिने स्वतःसाठी उच्च ध्येय ठेवलं होतं. तिला एक्सपर्ट सर्जन व्हायचं होतं. त्यात हे मध्ये योगेशचे "I love you" तिला वैताग आणत होतं. पटकन त्याला म्हणाली, "आयुष्यात काही मिळवायचं की नुसतीच गाणी गात, फिल्मी आशिकीत दिवस घालवायचेत?" तिला त्याचा पडलेला चेहेरा दिसला नाही, ना खच्ची झालेला आत्मविश्वास. आपल्या समाजाने काही विचित्र समीकरणे करून ठेवली आहेत, त्याचीच तीही एक शिकार होती. फक्त शैक्षणिक प्रगती असेल तर छान नाहीतर इतर सर्व कस्पटासमान! खरंच, कोण ठरवतं हे?
"डॉक्टर, बरं वाटतंय ना?" हे ऐकून ती भानावर आली. "येतेच मी. तुम्ही सर्व मदतनीस डॉक्टर्स आणि मेडिकल रिपोर्ट्स तयार ठेवा."
तिच्या नकारानंतर योगेश खूप बदलला. पण तो अनिकेतकडे येत राहिला. अभ्याससही जोमाने करू लागला. "ए, बस कर रे योग्या, बोअर करतोयस. चल, एखादं नवीन गाणं बसवूया." अनिकेतने हट्ट केलाच की थोडा वेळ गिटार हातात घ्यायचा.

आकांक्षांची बघता-बघता डॉ.आकांक्षा झाली. कॉलेजची कायम टॉपर होती. वर्गातले अनेक जण तिच्यामध्ये इंटरेस्ट ठेवून होते, पण कुणाची तिला विचारायची हिम्मत नव्हती. तिच्या करिअरच्या कल्पना सर्वांना ठाऊक होत्या. "अरे यार, हिच्या भानगडीत पडू नकोस बाबा.....एखादं स्मितहास्य मिळवायला पेशंट बनावं लागेल तुला". आकांक्षा ह्या सगळ्याला अनभिज्ञ होती. यशाच्या पायऱ्या सहज चढत होती. तिने एक सुपर-स्पेशॅलिटी हॉस्पिटल ही काढले होते. तिथे आलेल्या एका नवीन डॉक्टर बरोबर तिने लग्न केल्याचे कळले. दोघेही कमालीचे बिझी, मग नात्यांना फुलवायला वेळ कुठून येणार? डॉक्टर वेंकट हा एक निपुण कार्डियाक सर्जन होता, पण नियतीचा खेळ पहा; चाळिशीलाच वेंकटचे जबरदस्त ह्रदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ती थिजल्यासारखी झाली. सर्जरी करतांना नाती-गोती विसरून केवळ आपलं ज्ञान आणि कौशल्य पणाला लावावं लागतं, भावनांना तिथे थारा नसतो. अंगवळणीच पडलं होतं ते तिच्या.

आयुष्याच्या त्या काळात पोकळीतून बाहेर काढायला मदत तिला योगेशने केली. काहीही नं बोलता, नं सांगता तो येऊन तिच्या बरोबर बसू लागला. त्याची स्वतःची म्युझिक कंपनी होती, तरी वेळ काढून तो येत असे, काही अपेक्षा नं करता. का कुणास ठाऊक पण तिला त्याचा खूप आधार वाटत असे, एकटेपणा दूर करत असे.
"डॉक्टर, आम्ही सर्व आपलीच वाट बघतोय, येताय ना?"
आता आकांक्षा पटकन उठली. योगेशच्या विचाराने तिच्यात बळ आलं. आज परतफेड करायची, आधार द्यायची तिची वेळ होती. काहीही झालं तरी ही सर्जरी सफल होणं तिच्यासाठी खूपच महत्वाचं होतं. योगेश ऑपरेशन थिएटर मध्ये ऍनेस्थेशियाच्या इफेक्ट खालीही तिची वाट पाहत होता. तिला ते माहित होतं. त्याने तिला केवळ प्रेमाच्या व आपलेपणाच्या भावनेने अंतर्बाह्य बदलून टाकलं होतं. तिची संवेदनक्षमता वाढवण्याचं श्रेय फक्त योगेशचंच. अनिकेतनेही बहिणीच्या स्वभावापुढे हात टेकले होते पण योगेशचा विश्वास तिच्यातील खोल दडलेल्या मानवी चांगुलपणावर होता. आज अनिकेतही हॉस्पिटल मध्ये होता. मित्राच्या जीवासाठी याचना करत होता.
तेवढ्यात एक वयस्कर बाई आल्या, "डॉक्टर, माझ्या नातीचा जीव तुम्ही वाचवलात. तुम्ही देव माणूस आहात बघा!"
"कसली देवमाणूस? असते तर योगेशची ही परिस्थिती होऊच दिली नसती. इतका असाध्य पण भरभर पसरणारा कॅन्सर त्याला झालाच नसता" . ही टर्मिनल केस आहे, चांसेस फारच कमी आहेत असे सर्व एक्सपर्ट्सनी म्हंटले असून केवळ त्याच्या आग्रहाखातर ती तयार झाली होती. पण सर्जरीच्या आधीच त्याला कधीही व्यक्त न केलेल्या भावना सांगायचा विचार तिने आत येतांनाच मनाशी पक्का केला होता.
डॉ. आकांक्षाने ऑपेरेशनसाठी कोट चढवला. पुन्हा एकदा नजर भिरभिरली, सगळी जय्यत तयारी झाली होती...... जीवापलीकडील जपलेल्या नात्यांचा, अनुभवांचा कस पहाणारा प्रसंग.........
तिने सर्जरीसाठी टूल्स हाती घेतले ...... पेशंटच्या ह्रदयाची धडधड आधीच बंदच झाली आहे ह्याची भीतीदायक जाणीव झाली..... तिने परत तपासले. पल्स लागतच नव्हती. मॉनिटरच्या फ्लॅट लाईनने शिक्कामोर्तब केले. शेवटपर्यंत तिच्या तोंडून ते तीन शब्द ऐकण्यासाठी तो आतुरतेने वाट पहातच राहिला.
आकांक्षाने कधी मनाचा तो कप्पा उघडलाच नव्हता. आज मोकळेपणानी बोलणार होती.....पण त्याआधीच ती पुन्हा एकदा विधवा झाली. आकांक्षा पूर्णपणे कोलमडली. तिच्या ह्रदयाची धडधड पुन्हा वाढू लागली.........

* * * * *

# पाठवण

**लेखक - संजय राऊत**

पुन्हा एकदा नजर भिरभिरली. सगळी जय्यत तयारी झाली होती. जीवापलीकडील जपलेल्या नातयांचा, अनुभवांचा कस पाहणारा हा प्रसगं... वळे जसजशी जवळ येत होती तसतशी ह्रदयाची धडधड वाढू लागली... “हॅलो, हो मी मृण्मयी.... कधी येताय? ... सगळे वाट बघतायत. खूप वेळ नाही थांबू शकत. जरा लवकर या.” मृण्मयीने फोन ठेवला. वन रूम किचनच्या घरात स्वयंपाकघरात खुर्चीत मृण्मयी बसून होती. समोरच्या देव्हाऱ्यावर एकटक नजर लावून शांत बसून होती. डोळे डबडबलेले आणि कंठ दाटून आला होता. नातेवाईक, शेजारी सतत आतबाहेर करत होते. एवढ्या छोट्या घरात सगळं शक्य नव्हतं म्हणून सर्वकाही चाळीतील मधल्या मोठ्या जागेत करण्याचं ठरलं होतं. इतक्यात हेमांगी आत आली. “मावशी, सखीची साडी कुठे ठेवलीये? आणि हळद कुंकू सुद्धा मागगतलंय.” “साडी तिथे बेडवर काढून ठेवली आहे. आणि हळद कुंकू इथून देव्हाऱ्यातून घेऊन जा.” “तूला पण बोलावलंय” जाता जाता हेमांगी सांगून गेली. “हं. आले” म्हणत

मृण्मयी उठणार इतक्यात दरवाज्यात अरुण आला. “मृण्मयी, अगं चलतेस ना. बाहेर सगळे खोळंबलेत तुझ्यासाठी.” मृण्मयीने साश्रू नयनांनी एकवार अरुणकडे पहिले आणि म्हणाली, “अहो, मला जरा तुमच्याशी बोलायचंय. आपल्या सखीबद्दल” “आता वेळ आहे का? सगळे तुझी वाट बघतायत बाहेर आणि आत्ता ?”

“हो. आत्ताच बोललं पाहहजे. नंतर खूप उशीर होईल.” मृण्मयीच्या डोळ्यातील अस्वस्थता बघून, अरुण दोन क्षण तसाच थांबला. सगळं धैयव एकवटून मृण्मयी बोलायला सुरुवात करणार इतक्यात खालून कोणीतरी अरुणला हाक मारली. अरुणने खाली पहिले, मृण्मयीच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, “एक मिनिट दे. खाली बोलवतायत. मी आलोच. हं.” म्हणत अरुण निघून गेला आणण तयाच्या पाठमोर् या आकृतीकडे बघत मृण्मयी ततथेच बसून राहहली. डडलीवरीनंतर वॉड वबाहेर डॉक्टरांशी हुज्जत घालणारा पाठमोरा अरुण आठवला. एक दीघ वश्वास घेऊन मृण्मयी ववचार करत बसली. लहानपणी चाळीत पडद्यावर गचत्रपट बघताना जशी एखादी रीळ बायोस्कोप समोरून सरवकन तनघून जावी तशी सखीची बावीस वर्व ततच्या डोळ्यासमोरून जात होती. म्हणता म्हणता सखी बावीस वर्ावची झाली. ततला आठवले सखीचे गचमुकले, लुकलुकणारे डोळे. जन्मानतंर तब्बल चार हदवसांनी सखीने डोळे उघडले होत.े एवढ्या चार हदवसात नको नको तया शंका मनात येऊन गेल्या. मात्र आता सगळं जीवनच सखीमय होऊ लागल ंहोतं. ततचं खाणं, वपणं, बाळूती, दुपटी सगळं एक नवीन आनंद घेऊन येत होतं. एखाद्या परीसारखी हदसायची सखी. गोड हसायची. डोळ्यात एक वेगळीच चमक होती ततच्या. सगळ्यांना नुसतया नजरेनेच आपल ंकरायची. चाळीतल्या लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपयंत सगळ्यांची एकदम लाडकी झाली होती. सगळ्यांची सखीच झाली होती. आणण माझी ओळख “सखीची आई” “सखीची आई, मी सखीबरोबर थोडा वेळ खेळू?” “सखीची आई, अहो आज सखीचा आवाज नाही आला, आजीकड ेगेलीये का?” “सखीची आई, सखी बोलत का नाही? म्हणज ेआता चार वर्ाचवी झाली ना? ततला पोपटाचा उष्टा पेरु द्या.” “सखीची आई माझ्या ओळखीच ेएक डॉक्टर आहेत. तयांना दाखवता का?”

हं, आणण पोपटाचा उष्टा पेरु, डॉक्टर सगळं केल्यावर सखी साडचोर वर्ावची असताना पहहल्यांदा मला आई म्हणाली. “आई” . इतकी वर्व हा शब्द ऐकण्यासाठी कान आतूर झाले होते. एक हदवस डॉक्टरांनी फक्त दोघांना घरी बोलावलं. चहा वगैरे झाला. थोडा वळे सखीशी खेळल्यानंतर डॉक्टरांनी बोलायला सुरुवात केली. “हे बघा, खरं तर गेले पाच महीन े मी सखीला तपासतोय. आणण ततच्या वेगवेगळ्या चाचण्या देखील केल्यात. तुम्हीही बघताय की सखीची शारीररक वाढ हळू होतेय. पण बरेच वेळा ततचा मानभसक ररस्पॉन्स चांगला येत होता आणण म्हणून मलाही नीट कळत नव्हत. गेल्या आठवड्यात मी ततच ेकेस पेपर एका तज्ञ डॉक्टरांना दाखवले. आणण तयांनी ततच े परीक्षणही केले. सखीची आई, सखी बॉडवर केस आहे. ततला तुमचं सगळं कळेल पण ततची वाढ हळू होईल.” अरुण अततशय गचडला. “नाही. अस ंकसं शक्य आहे. ती व्यवस्स्थत आहे. ततला काही नाही झालंय.” एका बापाला आपल्या मुलीचं हे असं असणं मान्य होत नव्हतं. तो सतत डॉक्टरांना पटवून द्यायचा प्रयतन करत होता की सखी नॉमवल आहे. मृण्मयी मात्र हदग्मूढ होऊन तशीच बसून राहहली. अडीच वर् वदि ंन राहता येणं, चार वर् ं बोलता न येणं, ततच्या दातातील वाढतया फटी या सगळ्याचा अथ वततला समजत होता. अचानक िानावर येऊन ततने डॉक्टरांना ववचारलं, “हळूहळू का होईना ततची वाढ तर होईल ना?” “हो. होईल. पण म्हणजे...” डॉक्टर काही काळ शातं झाले. “म्हणजे? म्हणज ेकाय डॉक्टर?” “म्हणजे आम्ही ज्या केसेस आतापयंत पाहहल्यात तयात अशी मुलं पंधरा वर्ावच्या वर... सखीची आई, सखी स्जतकी वर् वआहे ततच्या सोबत आनदंात रहा.”

आणण मृण्मयी कोसळली. ततला रडू आवरेना. ओक्साबोक्शी रडली. पण तया नतंर पुढले बावीस वर्व ततने अश्रूंचा हटपुसही पडू हदला नाही. अरुणनेही कालांतरान े वस्तुस्स्थती स्स्वकारली. सखीसाठी दोघांनी स्वतःचं आयुष्यच वेचलं. ततच्यावरील लक्ष कमी होऊ नये, प्रेम वाटलं जाऊ नये म्हणून तयांनी नंतर मूल होऊ हदलं नाही. आज बावीस वर्ावत संपूणव पररसरात आणण नातलगांमध्ये सखीने स्जव्हाळ्याने आणण आपुलकीने इतकी माणसं जोडली होती, की ततला शेवटचा तनरोप देण्यासाठी सव वहजर होते. सगळी तयारी झाली होती. अरुण काही गोष्टी दुसर् यांकडे सोपवून मृण्मयीकडे परतला आणण म्हणाला, “हं, बोल” जीवापलीकडे जपलेल्या नातयांचा आणण अनुिवांचा कस पाहणारा हा प्रसंग होता. कसं बोलावं मृण्मयीला कळेना पण सगळा धीर एकवटून ती म्हणाली “अहो, मी तुम्हाला न ववचारता आज एक तनणयव घेतलाय. आपल्या सखीच ेडोळे दान करण्यासाठी मी नेत्रदान संस्थेच्या लोकांना इथे बोलावलय. त ेअध्या ववाटेत आहेत. मला वाटतंय आपण अजून थोडा वेळ थांबावं. आपल्या गचमुकलीचे डोळे कुणाच्यातरी उपयोगी याव े आणण ततचं अस्स्ततव या जगात अजून काही हदवस हटकावं यासाठी...” अरुणने मृण्मयीचा हात हातात घेतला आणण बाहेर सांगगतलं, “नेत्रदान संस्थेची गाडी येईपयतं थाबंा .”

* * * * *

# निर्णय

**लेखिका - रेवती कुलकर्णी**

चित्रा नावाप्रमाणेच दिसायला रेखीव होती, सावळीच पण तरतरीत, काळ्याभोर डोळ्यांची ,कोणालाही बघताक्षणीच भुरळ घालणारी!!

चित्रा एका फायनान्शियल कंपनीत अकाऊंटंट होती आणि कथ्थकनृत्यनिपुण असल्याने एका बॅले ग्रुपमधे हौस म्हणून काम करायची. संदीप तिच्या कंपनीचा मॅनेजर होता. अत्यंत हुषार ,कर्तृत्ववान, रुबाबदार संदीप म्हणजे मुलींसाठी आकर्षण बिंदू होता . पण त्याचे मात्र कामा व्यतिरिक्त कुठेही लक्ष नसायचे. कंपनीला एका बड्या क्लायंटची आॅफर होती, ती स्वीकारावी की नाही ह्यावर त्यादिवशीच्या मिटींगमधे जोरदार चर्चा चालू होती, तेंव्हा चित्राने ती कशी फायदेशीर आहे हे इतक्या मुद्देसुदपणे पटवून दिले की सगळ्यांनी तिचे मत उचलून धरले! संदीप तिच्या बोलण्याच्या शैलीमुळे भारावूनच गेला , इतक्या दिवसात आपले तिच्याकडे कधीच लक्ष कसे काय गेले नाही ह्याचा त्याला विस्मय वाटला. दिवसेंदिवस तिच्या हुषारीवर तो फिदाच होत गेला. तिच्यावर कधी मन जडले हे त्याचे त्यालाच समजले नाही.पण त्याच्या भावनांशी अनभिज्ञ चित्रा आपल्या कामाशीकाम ठेवून होती.

१५ ऑगस्टला तिच्या बॅले ग्रुपचा एका अनाथ मुलांच्या संस्थेला मदतीसाठी प्रोग्राम होता. त्याच संस्थेतून मोठा होऊन आता इंडियन आर्मीतील मेजर सुजय कार्यक्रमाचा प्रमुख पाहुणा होता. सगळा कार्यक्रम अतिशय सुंदर झाला, चित्राचा कथ्थक परफॉर्मन्स तर दृष्ट लागण्या सारखा झाला! तिच्या नृत्यावर प्रेक्षक बेहद्द खुष झाले, सुजयची अवस्थातर love at first sight!!!!

नंतरच्या डिनरच्या कार्यक्रमात त्याने तीचे खुपच कौतुक केले! दोघांनीही आपापले सेल नंबर शेअर केले, आणि परत भेटण्याचा वायदा करून एकमेकांचा निरोप घेतला. नंतरचे दिवस मंतरलेले होते , तीनचार भेटीतच त्यांनी लग्न करण्याचे ठरवले,तिच्या लाडक्या माईचा आपल्या मुलीच्या निवडीवर पूर्ण विश्वास होता. लवकरच शुभमुहुर्तावर त्यांचे शुभमंगल पार पडले, आणि मंतरलेल्या फुलपंखी क्षणांचा आनंद घेत घेत वर्ष कसे भुर्रकन निघुन गेले. थोड्याच दिवसात त्याचे पोस्टींग काश्मीरव्हॅलीत झाले आणि विरहाचे दिवस सुरु झाले! एकेक दिवस एकेक युगासारखा वाटू लागला ! सुजय तिथल्या अतिरेकी कारवायांचा बिमोड करण्याच्या मोहिमेत पुर्णपणे बुडून गेला!! चित्राला फोन करण्यासाठी सुद्धा त्याला वेळ मिळेना, असेच चार महिने गेले. चित्राने त्याला सरप्राईज द्यायला काश्मीरला जायचे ठरवले. संदीप कडे ह्यासंबंधी बोलण्यासाठी ती आली तेंव्हा त्याची नजर तिच्यावरून हटेचना!! लग्नानंतर अजूनच आकर्षक दिसत होती! आपल्या मनाला आवर घालत त्याने तिची रजा मंजुर केली. दुसऱ्याचदिवशी ती काश्मीरला पोहोचली .जेंव्हा सुजयने पाहिलं तिला , हर्षातिरेकच व्हायचा राहिला! इतक्या दिवसांचा विरह आनंदाश्रुत वाहून गेला. दुसऱ्याच दिवशी स्पेशल परमिशन घेऊन तो तिला काश्मीर दाखवायला घेऊन गेला . दललेक , चष्मेशाही, गुलमर्ग, सोनमर्ग आणि एकमेकांचा मदभरा सहवास ! दोघांनाही स्वर्ग दोन बोटे उरला. दोनच दिवसात पावसाला सुरवात झाली . काही दिवसातच त्याने रौद्ररूप धारण केले, नद्या भरभरून वाहू लागल्या, आणि बघताबघता प्रयलकारी परिस्थिती निर्माण झाली. जिकडे तिकडे पुराने हाहा:कार माजवला. लोकांच्या घरांत पाणी शिरले, माणसे, जनावरे पाण्याच्या ओढीत वाहून जाऊ लागली. लष्कर ह्या परिस्थितीला तोंड देण्यास सज्ज झाले. मेजर सुजयची रेस्क्यू ऑपरेशनचा हेड म्हणून नियुक्ती झाली. भयावह परिस्थितीत सुजयने न डगमगता सगळ्यांना विभाग वाटुन दिले, आणि तहानभुक विसरून सगळे कामाला लागले.

नदी समुद्रासारखी प्रचंड फुगली होती, ज्या वेगाने पाणी वहात होते त्यातून माणसांना वाचवणे फारच अवघड होत होतं. तशात बातमी आली एका दोन मजली घराच्या दुसऱ्या मजल्यापर्यंत पाणी चढले आहे आणि त्यात एक आजी आणि नात अडकले आहेत. सुजय स्वत:च रेस्क्यू टीम घेउन निघाला. त्या मुलीचे आजारी वडील पण तिथे होते ,त्यांच्यासाठी त्याने स्वत:चे लाईफजॅकेट काढून दिले. तो स्वत: उत्तम पोहणारा होता. त्यांनी मोठ्या शिताफीने त्या तिघांनाही लाईफबोटीत घेतले, आणि तेवढ्यात एक अजस्त्र लाट आली आणि सगळेच पाण्यात पडून वेगाने वाहत जाऊ लागले. सुजय आणि टीम प्रयत्नाची पराकाष्ठा करत होते, तशातच एक तुटलेला लाकडी खांब जोरात वहात आला आणि सुजयच्या डोक्यावर आपटला, त्याप्रहाराने तो बेशुद्ध होऊन वाहून जाऊ लागला, त्याच्याबरोबरीच्या जवानांनी त्याला पकडण्याचा खुप प्रयत्न केला पण लोकांकडे बघावे की सुजयच्या मागे जावे ह्या संभ्रमात असतानाच रोरावणाऱ्या पाण्याबरोबर तो वाहुन गेला!

चित्राला हि बातमी कळल्यावर दु:खातिरेकाने ती बेशुद्धच पडली. मिल्ट्री हॉस्पिटलमधे तीला ॲडमिट करण्यात आले. जरा शुद्ध आली की पुन्हा ती बेशुद्ध पडत होती. असेच आठ दिवस गेले. इकडे संदिपला बातमी कळाली तेंव्हा त्याने आधी माईना धीर दिला आणि तातडीने तीला घेऊन येण्यासाठी रवाना झाला.

त्याने लगेचच तीला पुण्याच्या एका नावाजलेल्या हॉस्पिटल मधे ॲडमिट केले. माई तर तिची अवस्था बघून घाबरून गेल्या होत्या. सहा महिन्यांत ती बऱ्यापैकी सावरली आणि संदीपच्या अथक प्रयत्नांमुळे ऑफिसात पुन्हा जॉईन झाली, पण पहिल्यासारखे काम तिला जमेना , त्यात एक दिवस संदिप घरी आला आणि माईसमोरच तिला मागणी घातली! चित्रा एकदम बावरूनच गेली, तर माई आनंदातिशयाने रडु लागल्या.

चित्राने रात्रभर विचार केला व दुसऱ्या दिवशी शांत चित्ताने आपले राजीनामा पत्र संदिपकडे सादर केले. नाराज होत तो तिला समजावू लागला. जरी विवाहाचा प्रस्ताव मंजूर नसेल तरी नोकरी सोडण्याची गरज नसल्याचे परोपरीने सांगू लागला.
ती संदिपला म्हणाली ‘सुजयला श्रद्धांजली म्हणून मीपण आता मिल्ट्री जाॅईन करणार आहे!’ तिच्या निश्चयाने फुललेल्या तेजस्वी चेहऱ्याकडे तो पहातच राहिला, आणि तिला कडक सलाम ठोकला! त्याच्या ह्याकृतीने वातावरण एकदम निवळले, दोघेही हसू लागले. दुसऱ्याच दिवशी तिला ट्रेनिंगला रवाना व्हायचे होते. रात्री माईच्या कुशीत तीला शांत झोप लागली.माई तिच्याकडे अभिमानाने पहात होत्या. झुंजुमुंजू झालं. रातराणीच्या सुगंधाचा दरवळ कमी होताच प्राजक्ताने पखरण केली. कळ्या उमलू लागल्या.चित्राने प्रसन्न चित्ताने नविन आयुष्याचे स्वागत करण्याठी हात जोडले

* * * * *

# चित्रकाव्य स्पर्धेच्या कविता




Photo credit – Girish Joshi

झाडातून तो खट्याळ पहातोय.
बिचाऱ्यावर तिचा राग निघतोय.
"मला नाही पहायची,
ही मोठी केलेली गरीबी,
मी जातेच कशी,
तुझी ही थेरं पहायला,
माझ्या कडे वेळ कुठला?"
कापडात लपेटलेली,
थंडीने कुडकुडलेली,
ते दोघे,
अजोबा नि नात छोटीशी,
डोळ्यातून बोलून गेली....!
"श्रीमंतीला थंडी लागत नाही? "
ते मिस्कील पोरं सांगतंय....!
"आजोबा,
पारा वाढलाय.
तापमान वाढलंय.
थंडी कसली घेऊन बसलाय?"

***अशोक हवालदार***

**शोकांतिका सिरियाची**

याचनेसाठी ह्या ठिकाणी
कुणी न आता राहिले,
मानवतेच्या इथे मर्यादा
झुगारून सैन्य चालले.
निसर्गाची होती उधळण
ती रक्ताने माखवली,
शुभ्र निरभ्र आकाशावर
तंबूंची सावली पाडली.
पालक पाल्यांची तटातूट
मनाचा थरकाप उडविती,
अन्न वस्त्र निवाऱ्याविना
मुले अनाथागत झोपती.
मुलांमधले मूलपण इथे
शोधूनही सापडेना,
नजरेत वयस्करांच्या
जीवनाचा अंश दिसेना.
पांढरपेशांना दर्शन घडवले
फलक लावून वैफल्याचे,
नदीकाठच्या प्रदर्शनाने
लक्ष वेधले काही क्षणांचे.
एका छायाचित्रकाराने केला
निष्फळ आग्रह जागृतीचा,
निरखून पहाता दिसला असता
आर्त आक्रंत बालकांचा.
लिहून कविता येथे मी
चार ओळी फक्त मांडल्या,
विस्कटलेल्या घड्या आयुष्यांच्या
मी ही तश्याच सोडल्या

***अजिता पणशीकर***

# रेशीमगाठी

## *वर पाहिजे*

०१. वय - २९, उंची - ५' ४'', शिक्षण - BTech (Computer science), नोकरी - SAP LABS Bangalore, अपेक्षा - आंतरजातीय चालेल, Engineer, IT मध्ये काम करणारा, उंची ५' ६'' किंवा जास्त, संपर्क - ९७४०९३१९११, ९८३३००१४०८

०२. वय - ३४, उंची - ५' ४'', शिक्षण - BE (Electronics and telecommunictions), नोकरी - TCS, अपेक्षा – Divorced, no kids, working in Mumbai, संपर्क - ९८३३००१४०८

## *वधू पाहिजे*

०१. वय - ३२, उंची - ५' ८'', शिक्षण - BE (Computer), नोकरी - Rohdef Shaws Co, अपेक्षा - उंची ५'२" किंवा जास्त, सडपातळ, BE - computer, Field service, MCA, MSc computer, MSc statistics, , संपर्क - ९५३८१८८८४४




Photo credit - Girish Joshi

संध्याकाळ

संध्याकाळ सर्वत्र सारखीच असते
पण गावापासून दूर आलं की,
काळजात रुतून बसते
तिला दिवस मावळल्याचे दुःख  नसते
चांदणं उगवल्याचे सुख नसते
ती तर नुसतीच क्षितिजाकडे पाहून
उदासवाणे हसत असते
घरी परतणाऱ्या गुरांना
दावणीची ओढ असते
पिंजऱ्यातल्या मैनेला
भरारण्याची आस असते
पारावरल्या पिंपळाला
चुकलेल्या गायींची साथ असते
या सगळ्या भावनांचे
संध्येला सोयर-सुतक नसते
ओढ्याकाठी आलं की..
झाडातून चिंचा खुणावतात,
करवंदांच्या जाळीतून
स्मृती- काजवे चमकू लागतात..
अशाच कातरवेळी मैत्रीचे
गहिवर दाटून येतात..
संध्याछायेत आपल्याच सावल्या
आपल्याला पारख्या होतात..

अभय नातू

असं तांबड फुटलं.
नवा दिस उजाडला.
कोवळ्या किरणांनी,
अंगी उत्साह संचारला.

***अशोक हवालदार***

तू रवीकर , अन् मी अधिराणी .
नाते कसे जुळायचे ?
रोज तुझा रे स्पर्श होऊनी ,
तनमन माझे फुलायचे .
सांज-सकाळी क्षितीजाआडूनी
दडूनी मजला पाहताना ,
लाज-लाजेने लाल होऊनी ,
लाजेत तुजला भिजताना .
लाले-लाल ते गोंडस रूपडे
मला पाहता राहवेना ,
येऊनी आता माथ्यावरी तू ,
मनी खळखळूनी हसतो ना .
क्षितीजावरूनी निरोप घेता
लाज तुझी तुज आवरेना ,
आता तुझ्या तर मनातले रे ,
प्रेम हे मजला कळले ना .

***रवींद्र झिमरे***

**सूर्यास्त**

सागराचा खेळ चाले खालती वरती
तोच नभाला सप्तरंग हे सापडले हाती
भरती आली होती तेंव्हा शांत समुद्राला
आकाशावर रंग उधळण्या हा तारा आला
रंग नाभाचे क्षणी बदलती भारावले विश्र्व
दिशदिशांतुन दिसू लागला सुंदर सूर्यास्त
खडकावरी परी कुणी बसे एकला कोण मुशाफिर
नतमस्तक होऊनि पहातो खास चमत्कार

***उषा चितळे***

**लालिमा**

क्षितिजावरली बघुनी लालिमा
क्षोभित नभ शांत झाला
पाहता गुलाबी गाल धरेचे
रविही खोळंबला
कुरवाळाया बट धरेचे
पवनही सरसावला
बघुनी लाजरे नयन धरेचे
नभही ओथंबला
सुरम्य होती तरुवर
ह्या रोमांचित लहरीने
हलकेच मागे सारती
जाळेच लतारूपी बटांचे
बघुनी नभ गुंग होई
हे मोहक रूप धरेचे
आवेगे मिठीत घेई तिजला
बेधुंद बरसला सरीने
देई साक्ष सुंदर प्रेमाची
खडकाळ माळरानी डोकावलेली अंकुरे
झराच फुटुनी वात्सल्याचा
उमलती कुसुमावरती तुरे
हर्ष बहरतो चोहीकडे
जेंव्हा येती फुलपाखरे

***वैशाली उत्तरवार***

**प्रवास**

हे माणसा सुरु झाला तुझा प्रवास
मातेच्या गर्भातून विश्वाच्या पसाऱ्यात
मातापित्यांची पाखर मिळता पक्षी आकाशात उंच उडे
विद्येचे बळ मिळता हिऱ्याला जणू पैलू पडे
तरुणाईचे दिवस ते तुझे उत्श्रुंखल वागणे
मात्र अनुभवाचे दोर मिळताच यशाचे शिखर गाठणे
तुझी भ्रमंती तुझी सफर तुझा प्रवास
थांबू नकोस मध्ये जोवर घेशील अखेरचा श्वास
भूतदया आणि वैश्विकता राहिली का फक्त पुस्तकांमध्ये
दुबळ्यांसाठी कर काही रमू नको फक्त भौतिकामधे
जीवनाच्या रथामध्ये साथीला बसतील मित्र आणि नाती
नसे ठावे तुला शेवटी कोण राहील तुझ्या सोबती
सर्व जाणता आहे मी असेल समजूत तुझी पक्की
कोहम हा प्रश्न तुला पडेल एकदा तरी नक्की
जीवनाच्या या प्रवासात नव्या जुन्या वळणावर
जपून ठेव नाती जाईस्तोवर सरणावर.

***समीर प्रधान***




Photo credit – Rajiv Chalke

रात्रीची अखंड रिमझिम,
पायवाट भिजवून गेली.
हिरवाईने आपली अंघोळ,
अंधारातच उरकून घेतली.
कातळातली वेडीवाकडी,
पायरी माझ्याशी अचानक,
बोलू लागली.
"रोज दव भिजवतात,
आज मनसोक्त पावसात.

***अशोक हवालदार***

**वाट आयुष्याची**

आयुष्याची वाट ही पुढची,
असेल सोपी वा ती अवघड,
अनाकलनीयच सारे
चालणे सोपे वा ते अवजड;
असतील ते हात हातात
वा दुभंगतील का वाटा नंतर,
मनांमधील वाढतील दुरावे
का मिटेल ते हृदयांतील अंतर?
भेटतील का वाटा अपुल्या,
वा चालतील का त्या समांतर,
विरहांती होईल मीलन
वा विरह कायमचा भेटीनंतर?
नागमोडी वळणे असतील कि
सरळ सोपा हा मार्ग सुखकर,
असेल हिरवळ वाटेवरती
वा खडकाळच तो मार्ग निरंतर?
दुखाच्या डोंगरातुन पावेल का
उगम सुखाचा झरा तो निर्झर,
दाटतील का लोचनी आसवे
वा असेल केवळ हसू ओठांवर?
जातील का पूर्तीस आकांक्षा,
वा धूळीस मिळतील का अर्ध्यावर,
यत्न शर्थीचे निष्फळ ठरतील
वा मिळेल प्रयत्नांती परमेश्वर?
प्रश्न आणि प्रश्नच सारे,
आयुष्य कधी देईल का उत्तर,
आपुल्या हाती नशीब अपुले
वा हातावरल्या रेषा बलवत्तर?
कामना कर्मफलाची त्यागून
वाटचाल ही जरी अशक्यपर,
असे कर्म नि कर्तव्यही अपुले
चालणे अविरत जीवन पथावर!

***मेघना तत्ववादी***

**पायवाट**

लोळण घेऊन खडकावरती
पायवाट ही पुढे सरकते
सवे घेउनी रानफुलेही
हिरवळ लेऊन पुढेच जाते
झाडी दाटली सर्व दिशांना
आडवी तिडवी वाट चालत
नेसून हिरवा हिरवा शालू
भूदेवी ही तिज गोंजारते

चोहीकडचे बालतारूही
गाती नाचती आनंदाने
घेऊनि उड्या खेळत फुगडया
पायवाट ही आनंदे गाते

***उषा चितळे***

प्रत्येकाच्या मनात एक छोटंस गाव असतं
ते किती सुंदर आहे हे ज्याचं त्यालाच ठाव असतं
तांबडी लाल माती नि हिरवी गार शेतं
कौलारू घरांची शाकारलेली छतं
कुठल्याशा घरातून म्हातारी बोलावते
ओळखीचे कोणी नाही म्हणून पापणी ओलावते
कोणाची गं पोर तू? ये आत ये म्हणते
वाकून भाकरी वाढतांना जराशी कण्हते
तिच्या हाताची चटणी भाकरी लागते इतकी गोड
कारण त्यात असते माया नि आपुलकीची ओढ
भाकर खातांना माय पाठीवरून हात फिरवते
टचकन डोळ्यात पाणी येतं नि आईची आठवण येते
बाहेर खटल्यावर असतो एक म्हातारा
चिंपटं मापटं शरीर नि डोळ्यापुढे अंधार सारा
जायची वेळ आल्यावर पाय निघता निघत नाही
आपण वळून पाहिलं नाही तरी गाव पाहत राही
गाव सोडलं तरी मन गावापाशीच राहतं
त्याच्या डोळ्यांनी ते सारं गाव पाहतं
प्रत्येकालाच गावी राहिलेले दिवस परत यावेसे वाटतात
गावाची नुसती आठवण झाली तरी डोळ्यात अश्रू
दाटतात.

***आरती कुलकर्णी***



Photo credit – Kaiwalya Limaye

## हल्ली मी ठरवलंय !

हल्ली मी ठरवलंय, स्वत:ला जपायचं
स्वत:मधल्या स्वत:लाच प्रेमानं गोंजारायचं
जिथे गुदमरतो श्वास, तिथे नाही थांबायचं
हसावं वाटलं तर , खळखळून हसायचं
नाकावरल्या रागालाही,जरूर येऊ द्यायचं
रडावं वाटलं तर, स्वत:च स्वत:चा खांदा व्हायचं
मी कशी दिसतेय, कुणालाच नाही विचारायचं
आरश्यात स्वत:ला पहात,स्वत:च मुरकायचं
कधीतरी असंच, खुप आळशी व्हायचं
मलाही ‘change ‘हवाच की, स्वत:लाच बजवायचं
मित्र-मैत्रिणीबरोबर मिळून ,खुप खुप बागडायचं
वयं असो कितीही,नेहमी तरूणच रहायचं
स्त्रीत्वाला आपल्या, ना गृहीत धरू द्यायचं
स्वावलंबी होऊन, ताठ मानेने चालतच राहायचं
‘बकेट लिस्ट’ तरी कां बनवावी??
जे मनांत येईल ते करून मोकळे व्हावे
आपल्या ईच्छा आपणच पूर्ण करायच्या
मी ठरवलंय .. मी ठरवलंय!

*जयश्री पोतनीस*

दार तर उघडंच.
कडीही तशीच.
आई कुठे बरं असेल?
हा भोपू काम करेल?
"आई......!"
"आले हं राणी....!"
आवाजाच्या दिशेने,
बोलके डोळे,
वाट पाहू लागले.

*अशोक हवालदार*

**बंद दाराआड आहे वात्सल्य ते नांदते**
**आणि दाराआड नियती पाहण्या डोकावते**
**त्याच दाराआड डोळे ते कुणाचे बोलके**
**आतल्या गर्भात सारे पाहती काळोख ते**
**आत आहे स्वप्न छोटे पामरांनी पाहिले**
**दार उघडावे कधी त्या आस ही खुणावते**
**दार नशिबाने जरासे आज केले हे खुले**
**आणि डोळे कौतुकाने या सुखांनो बोलले**

***विनायक कांबळे***




Photo credit - Kaiwalya Limaye

माझं हे,
रंगतदार,
सोनेरी चमकदार,
नक्षीदार,
माझंच अनोखं रूप,
पाहू तरी कुठं नि कसं?"

"त्यात काय मोठं?
पहाना माझ्या डोळ्यात.
तेच रंगतदार,
सोनेरी चमकदार,
नक्षीदार,
तुझं रूप.

***शोक हवालदार***



Photo credit – Rajiv Chalke

गर्भ
मी तुझाच आहे हे डोकावून सांगण्या साठी
बाहेर पडण्याचा माझा आटोकाट प्रयत्न
वज्राहून कठीण दगडाला भेदून मूठभर मातीत
स्वतःलाच गाडून घेत
कोसळणाऱ्या पण न थांबत जमिनीकडे झेपावणाऱ्या
प्रत्येक थेंबाला
पिवून टाकत मी लढलो आहे जन्माची लढाई.....
का?????

आग ओकणाऱ्या आकाशाकडे बघत
उजाड पडलेल्या ह्या निष्पर्ण बोडक्या कातळाकडे बघत
त्वेषाने मला फेकून देवून
कुणीतरी ह्या वांझोट्या म्हणून शापलेल्या तुला
गर्भारलेली केले होते,
तो त्वेषच मला अंकुरण्याचे कारण देतो
मी त्या सृजनाच्या व तुझ्या मिलनाची साक्ष देत
अनेक कळा देवून ही माझ्या इवल्याशा पानाने बाहेर
डोकावतो

जणू तुझ्या कपाळावर चे वांझोटेपण पुसत
हिरवा टिळा गोंदवतो

स्वाती काळे

किमया

सुस्नात अहा दिसतसे कोवळे रोप ते
कुशीतुनी धरेच्या पहा कसे डोकावते
कठिण कवच माळाचे लीलया चिरुनिया
डौलात हासतसे सूर्यकिरण लेवुनिया
रूप कोवळे जरी करी मुदित साऱ्या जना
कंच हरित वर्ण घालितसे भुरळ मना
रविरश्मींची ओढ ती प्रकटते नेत्रांतुनी
नाजुकशी न्यारी छबी भासते गोजिरवाणी
किमया अनोखी सृष्टीची देखुनी हरखलो
सहज जुळती कर हर्षित मी धन्य झालो !

धनंजय जोग

काळ्या कातळावर,
अंकुरले इवलेसे रोप.
संपवून काळी रात,
झटकून गाढ झोप.
नवं नवं एक पान,
जाई नभाच्या दिशेनं.
नवी कोवळी पालवी,
पाही कोण कौतुकानं.
जीवनाची आशा अशी,
पल्लवीत जावी कशी.
अंकुराने भेट की दिली,
कातळाला शोभा आली.

अशोक हवालदार

नाही मातीचा उबारा परि
फुटे दगडा पाझर
बीज देताच हुंकार
घेई उचलून वर
शाळेत शिकवले यांना
झाला डोंगर उजाड
द्या उधळून बीया
नको नुसते उनाड
उत्साहाने तरुणाई
गलक्याने गोळा होई
मार्गदर्शनच नाही
बियाणांना नाही भुई
कोणा हवे जास्त पाणी
कोणा हवे रोज ऊन
पावसाच्या चाहुलीत
दिले त्यांनी भिरकवून
पण तुम्ही आत्ता असे
आश्चर्याने पाहताना
मान माझी उंचावते
जणू मोर पिसाराना
कातळ बांधव वाट
देतील करून
आता थांबायचे फक्त
महावृक्षच बनून

हेमांगी मुळे

जिगीषा

रोज येता जाता बघत होते तुला
तुझं डेरेदार अस्तित्व सुखावत होतं मला !
ऊन - पाऊस झेलत किती वर्षे उभा होतास तू
ध्यानस्थ , तपस्वी योगी वाटायचास तू !
एक दिवस अवचित ---------
घाव पडला तुझ्या शिरी , कळ उठली माझ्या उरी !
निर्दयतेचे घाव सोसत , मूक अश्रू ढाळत,
तू तुझी आहुती दिलीस
मानवाच्या प्रगतीची किंमत मोजलीस !
काही महिने गेले , वहिवाट तसाच राहिला ,
मी मात्र येता - जाता,
टाळत होते ......
तुझ्याकडे बघणं , तुझा विचार करणं !
आणि मग अचानक .... तू दिसलास !!
शुष्क खोडातून जीव उसळला !
तुझ्या रूपाने गवसली मला
जीवनाची दुर्दम्य आशा !
सगळं " संपलं " असं वाटतानाच
पुन्हा अंकुर फुटावा
पुन्हा एकदा जीवन फुलावे !
बाहेरच्या अंधाराला , आतून उजळवावे !!

वीणा कवठेकर

हिरवागार दिसतोस कसा
निरागस आहेस तू
तजेल पाहूनी तुला
मन प्रसन्न केलेस तू
उभा कसा खडकात हसऱ्या

ताठ मानेने तू
आहेस भक्त सूर्याचा
मित्र आमचाच तू
फुटला अंकूर तुला
वृक्ष होशील तू
देता साऊली जगा
जगन्मित्र झालास तू
अरे पाना खरे सागू
प्रेरणा माझी आहेस तू

मधुरा गोखले

संघर्ष

तुला उगवायचचं असेल तर खडकातही उगवशील,
संघर्षाशिवाय यश नाही हे उगवताना जाणशील.
काळ्याभोर खडकात अन् प्रवाहाच्या विरोधात
तू स्वतःच अस्तित्व निर्माण करशील
एकटाच आलास एकटच जायचयं
स्वतःच अस्तित्व तुला आभाळावर कोरायचयं
अवघड असतं संघर्ष करत जगणं
पण अशक्य काहीच नसतं
माणसाच्या गर्दीत सुद्धा कोणीतरी एकटं असतं
एकटं जगण्यात विचारांना आवर नसते
जिद्दीला पेटल्यास मग कोळश्याचा हिरा बनायला
कोणतेच बंधन नसते.
आशेचे पंख आहेत उडण्याचा प्रयत्न कर
तुला पोटात साठवलेला खडकच आहे हे मात्र ध्यानात
धर

वैशाली तोडकर

आशेचा अंकुर

विचारांना न व्हावा कधी विकारांचा संकर
कातळातही उमलून फुलवा आशेचा अंकुर
निरर्थक कोलाहलात व्यर्थ घुमतो मीपणाचा आवाज
कोण तू कोण मी कुणा दाखवण्या कसला हा माज
दंभनिद्रेतून गाढ यावी खडबडून जाग आज
उन्मळून उध्वस्त व्हावे या अहंकाराचे घर
स्वत:चेच चोचले हौस हव्यास भले पुरवले
आपल्यात मग्न मन हे माझे सदा गुरफटलेले
कळवळणे व्यथेने कुणाच्या कुणा आनंदाचे भरावे पेले
तेंव्हाच उलगडून आकळावे शबरीचे उष्टे बोर
किती हेवेदावे किती काळ वाहावे गतकाळाचे बोजे
दु:खाचे कडवट कढ नि वांझ उसाशांचे ओझे
पूर्वीची उजळणी सोडून करू पूर्वेची जुळणी आज
भविष्याची वाहू पालखी लावून उभारणीची झालर
जगरहाटीत हरवला अंतरात स्वत:च्याच अंतरला
मळल्या वाटेने वाळले श्वास घेऊन दावणीला बांधलेन
नव्या दिसांची नवी कात आकारण्या नव्या माणसाला
शोधतो स्वत:ला डोहात अंतरीच्या झोकून आरपार

यतिन सामंत

अंकुर

या उजाड माळावरती
वात्सल्याचा सदा शिंपला
आणि काळ्या खडकावरती
चैतन्याला पान्हा फुटला
कोवळे अंग अलवार
कोवळा श्वास हा मंद
नाचवी पावन हा धुंद
लावूनी ध्यास जीवाला
हा कोवळा अंकुर फुटला
हा कोवळा अंकुर फुटला

उषा चितळे

सृजन

बीजामध्ये दडला आविष्कार सृजनाचा
माती देतसे आशीर्वाद ममतेचा वात्सल्याचा
असो मृत्तिका किंवा कातळ
वसा त्याचा राखणीचा
बीज रुजता पसरे आनंद पाचू पालवीचा
पहिले थोरले पण करी कोट अस्तित्वाचा
सांभाळून साथ देई राखी जीव धाकल्याचा
निर्व्याज बालपण त्याला आधार जाणत्याचा
कोवळे तारुण्य ते घेई श्वास विश्वासाचा
पालवीला ध्यास असतो प्रगतीचा
नवे जग पाहुनी जाणून घेण्याचा
सोहळा असे हा नव्या पालवीचा
सृजनाचा प्रवास चाले मार्ग समृद्धीचा
बीज इवले इवले नसे अनुभव जगाचा
असो पण अथवा बालक हाचि संदर्भ जगण्याचा
फांदी फांदी विस्तारून होतो वृक्ष रोपट्याचा
घडतो तैसाची माणूस डोळस घडणीचा

राधिका मराठे